सुविचार

प्रेम एक बडी शक्ति है परन्तु पवित्र प्रेम करने के लिए बहुत शक्ति चाहिए ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. २७ जूलै २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१६१ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

भारत उद्धटपणाला देईल चोख प्रत्युत्तर

मोदींनी दिला पाक, दहशतवाद्यांना इशारा

नवी दिल्ली : : देशभरात आज कारगिल विजयाचा २५ वा वर्धापनदिन साजरा केला जात आहे. या दिवसानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी आज लडाखमधील द्रास येथे पोहोचले आणि कारगिल युद्ध स्मारकावर देशातील शूर शहिदांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताच्या शत्रू आणि दहशतवाद्यांना थेट इशाराही दिला. भारत कोणत्याही उद्धटपणाला चोख प्रत्युत्तर देईल, पाकिस्तानने यापूर्वी कितीही प्रयत्न केले, त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले, मात्र पाकिस्तानने आपल्या इतिहासातून काहीही शिकलेले नाही. अशी सडकून टीका पंतप्रधान मोदींनी पाकवर केली.

लडाखमधील द्रास येथील कारगिल विजय दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत असताना मोदी म्हणाले की, आज मी अशा ठिकाणाहून बोलत आहे जिथे दहशतवाद्यांना माझा आवाज थेट ऐकू येईल. दहशतवादाच्या या समर्थकांना मी सांगू इच्छितो की त्यांचे नापाक मनसुबे कधीही यशस्वी होणार नाहीत. आमचे शूर जवान दहशतवादाला पूर्ण ताकदीने चिरडून टाकतील. शत्रूला चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही पंतप्रधानांनी दिली.

पाकिस्तानने अविश्र्वासू चेहरा दाखवला- मोदी

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कारगिल विजय दिनानिमित्त सांगितले की, कारगिल युध्दापुर्वी भारत शांततेसाठी प्रयत्न करत होता. मात्र, पाकिस्तानने पुन्हा एकदा आपला अविश्र्वासू चेहरा दाखवला. पण सत्यासमोर असत्य आणि दहशतीचा पराभव झाला. आम्ही फक्त कारगिलचे युद्ध जिंकले नाही. तर आम्ही सत्य, संयम आणि शक्तीचे अप्रतिम प्रदर्शन केले होते, असा दावा पंतप्रधान मोदींनी केला.

राहुल गांधींनी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली

दरम्यान, कारगिल विजय दिनानिमित्त, लोकसभेतील (पान २ वर)

खाणी, खनिजावर कर हा राज्यांचा वैधानिक अधिकार

नवी दिल्ली :- खनिजांवर देय असलेली रॉयल्टी हा कर नाही आणि राज्यांना खाणी आणि खनिजे असलेल्या जमिनींवर कर लावण्याचा वैधानिक अधिकार आहे, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला असून त्यामुळे केंद्र सरकारला मोठा झटका बसला आहे.

या निकालामुळे झारखंड, ओडिशासारख्या खनिज संपन्न राज्यांना अधिक महसूल मिळण्यासाठी महत्त्वाचा ठरणारा निकाल सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील ९ न्यायाधीशांच्या घटनापीठाने ८:१ अशा बहुमताने दिला.

खाणी आणि खनिजांवर केंद्राने आकारलेल्या हजारो कोटी रुपयांच्या करांच्या रकमेच्या वसुलीबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय घ्यावा, अशी विनंती खनिजसंपन्न झारखंड, ओडिशासारख्या राज्यांनी केली होती. केंद्राकडून कर परतावा मिळावा यासाठी राज्यांनी सर्वोच्च न्यायालयाला पूर्वलक्षी प्रभावाने निकाल लागू करण्याची विनंती केली. तथापि, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी या मागणीला कडाडून विरोध केला. याबाबत केंद्र व राज्यांनी आपले उत्तर सादर करावे. त्या मुद्द्यावर ३१ जुलै रोजी निर्णय घेतला जाईल, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले. खंडपीठाने म्हटले की, रॉयल्टी हा कर आहे, असा निकाल सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने १९८९ साली दिला. तो निकाल चुकीचा आहे. खाणी व खनिजे कायदा हा राज्यांना खाणी आणि खनिज विकासावर कर लागू करण्यापासून रोखत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. एकाच खटल्याचे दोन निकाल खनिजांवर देय असलेली रॉयल्टी हा कर नाही यावर नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठातील आठ न्यायाधीशांनी शिक्कामोर्तब केले व त्याचा निकाल जाहीर केला. तर या निकालाशी असहमती दर्शविणारे निकालपत्र न्या. बी. व्ही. नागरत्न यांनी दिले. त्यामुळे एकाच प्रकरणात दोन निकाल देण्यात आले. मात्र बहुमताने दिलेला निकाल अंतिम मानण्यात आला.

गणेशोत्सव होणार गोड

मुंबई : प्रतिनिधी- यंदाच्या गौरी-गणपती उत्सवानिमित्त प्रत्येकी एक किलो या परिमाणात रवा, चना डाळ, साखर व १ लिटर सोयाबीन तेल या शिधाजिन्नसांचा समावेश असलेला 'आनंदाचा शिधा' प्रति शिधापत्रिका १ शिधाजिन्नस वितरित करण्याचा निर्णय राज्याच्या पुरवठा विभागाने घेतला आहे.

दरम्यान, यंदाच्या गौरी-गणपती उत्सवानिमित्त राज्यातील १ कोटी ७० लाख ८२ हजार ८६ शिधापत्रिकाधारकांना 'आनंदाचा शिधा' वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. प्रति संच १०० रुपये या सवलतीच्या दराने मिळणा-या या 'आनंदाचा शिधा' संचामध्ये प्रत्येकी एक किलो रवा, चणा डाळ, साखर आणि एक लिटर सोयाबीन तेल या शिधा जिन्नसांचा समावेश असणार आहे. 'आनंदाचा शिधा' संचचे वाटप दि. १५ ऑगस्ट २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील वर्धा या १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील (एपीएल) केशरी शिधापत्रिकाधारक शेतकरी यांना या आनंदाचा शिधा मिळणार आहे.

प्रति शिधापत्रिका एक शिधा जिन्नस संचाची खरेदी करण्यासाठी ५६२.५१ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या संचाचे वाटप ई-पॉस प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे.

काशी पिठाचा पुरस्कार सोहळा आयोजित

प्रा. बी. व्ही. मोतीपवळे यांना पत्राकरिता पुरस्कार

सोलापूर - काशी पिठातर्फे दिला जाणारा पुरस्कार सोहळा येत्या २७ जुलाई २०२४ रोजी सोलापूर येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात संपन्न होणार आहे. या प्रसंगी काशी पिठाचे महास्वामीजी डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य व नूतन महास्वामीजी डॉ. मल्लिकार्जुन शिवाचार्य यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दिलीप स्वामी जिल्हाधिकारी औरंगाबाद हे उपस्थित राहणार आहेत.

विविध क्षेत्रातील पुरस्कारामध्ये एकूण आठ व्यक्तिंचा सत्कार होणार असून त्यात लातूरचे प्रा. बी. व्ही. मोतीपवळे यांना पत्रकारितेच्या क्षेत्रातला पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

आदर्श शिक्षक म्हणून श्री. राजेंद्र बलसुरे सोलापूर, समाजसेवक पुरस्कार श्री. महेश स्वामी पुणे, श्री. बसवराज शास्त्री, सोलापूर, नाटकर्मी पुरस्कार, श्री. गुरूनाथ वठारे व किर्तनकार पुरस्कार डॉ. अनंत भाऊ बिडवे, बार्शी तसेच कु. ऐश्वर्या कुलकर्णी, उस्मानाबाद यांना दिला जाणार आहे. असे संयोजक सिद्धय्या स्वामी हिरेमठ, बाबूराव मैंदर्गीकर, डॉ. अनिल सर्जे यांनी कळवले आहे.

गाझामधील इस्रायलचा 'नरसंहार' थांबला पाहिजे

नवी दिल्ली : काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी-वाड्रा यांनी आज गाझामध्ये निष्पाप लोक मारले जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. त्यांनी जगातील प्रत्येक सरकारला गाझामधील इस्रायलच्या लष्करी हल्ल्याचा निषेध करण्याचे आवाहन देखील केले आहे. प्रियंका गांधींनी एक्सवर पोस्ट करून म्हटले की, गाझातील निष्पाप मुलांसाठी डॉक्टर, पत्रकार, आई, वडील, नर्स, लेखक, जेष्ठ नागरिकांसाठी फक्त बोलणे पुरेसे नाही, तर प्रत्येक उजव्या विचारसरणीच्या व्यक्तीची आणि जगातील प्रत्येक सरकारची जबाबदारी आहे की त्यांनी गाझातील नरसंहार थांबवण्यासाठी इस्रायल सरकारवर दबाव टाकावा असे प्रियंका गांधी म्हणाल्या.

प्रियंका गांधी यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांच्यावरही निशाणा साधला. पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी बुधवारी अमेरिकन काँग्रेसच्या संयुक्त सभागृहाला संबोधित केले. यानंतर दोन्ही सभागृहातील खासदारांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या. त्याचवेळी काही नेत्यांनी इस्रायलच्या पंतप्रधानांचे भाषण ऐतिहासिक असल्याचे सांगितले होते. सभ्यता आणि नैतिकतेचा दावा करणा-या जगात त्यांची कृती अस्वीकार्ह असल्याचे प्रियंका गांधी म्हणाल्या. त्यांनी अमेरिकन नेत्यांची खिल्ली उडवली आणि म्हटले की, जे मानवता आणि सभ्यतेवर विश्र्वास ठेवतात त्यांनी असे करू नये. गाझामध्ये इस्रायलकडून पाश्र्चिमात्त्य देशांच्या पाठिंब्याने सुरू असलेला रानटीपणा पाहणे लाजिरवाणे आहे, अशी सडकून टीकाही त्यांनी केली.

प्रियंका गांधी-वाड्रा यांनी गाझामधील इस्रायलच्या कारवाईचे समर्थन केल्याबद्दल आंतरराष्ट्रीय समुदायावर टीका करण्याची ही पहिलीच वेळ नाही. फेब्रुवारीमध्ये प्रियंका गांधी म्हणाल्या होत्या की, न्याय, मानवता आणि आंतरराष्ट्रीय शालीनतेचे (पान २ वर)

काँग्रेस नेते राहुल गांधी सुलतानपूर कोर्टात झाले हजर

सुलतानपूर : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज अमित शहा यांच्यावर अपमानास्पद टिप्पणी केल्या प्रकरणी मानहानीच्या खटल्यात सुलतानपूर खासदार-आमदार न्यायालयात हजर झाले. यावेळी त्यांनी न्यायालयासमोर आपला जबाब नोंदवला. यावेळी राहुल गांधी म्हणाले की, आजपर्यंत त्यांनी कधीही कोणाच्या विरोधात असे वक्तव्य केलेले नाही ज्यामुळे मानहानीचा गुन्हा दाखल होऊ शकेल. न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी १२ ऑगस्ट रोजी ठेवली आहे.

राहुल गांधींचे वकील काशी प्रसाद शुक्ला यांनी सांगितले की, विशेष न्यायाधीश शुभम वर्मा यांच्यासमोर राहुल गांधी म्हणाले की, माझ्याविरोधात न्यायालयात दाखल करण्यात आलेला खटला केवळ लोकप्रियता मिळविण्यासाठी करण्यात आला आहे. (पान २ वर)

सोलापुरात काशी जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजींच्या दिव्य उपस्थितीत दीक्षा कार्यक्रम संपन्न झाला.

सशक्त लोकशाहीसाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांची सेवा महत्वाची

पुणे : प्रतिनिधी- लोकशाहीला सशक्तीसाठी प्रशासकीय अधिकायांची सेवा अत्यंत महत्वाची आहे. राष्ट्रप्रगतीसाठी मानव सेवा हा महत्वाचा घटक आहे. ग्रामीण क्षेत्राच्या उन्नतीसाठी प्रशासकीय सेवेत खूप काही करण्यासारखे आहे. त्याच प्रमाणे नव्या पिढीसाठी देशात गुणवत्तापूर्ण उत्तम दर्जाचे शिक्षण आणावे असे मत लोकसत्ता पार्टीचे अध्यक्ष व माजी सनदी अधिकारी डॉ. जयप्रकाश नारायण यांनी मांडले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी व एमआयटी स्कूल ऑफ गर्व्हमेंट, पुणेतर्फे एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर सभागृह, कोथरूड येथे आयोजित करण्यात आलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) स्पर्धा परीक्षा२०२३ मध्ये यशस्वितांचा १४वा राष्ट्रीय पातळीवरील सत्कार सोहळ् याच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) माजी अध्यक्ष डी.पी.अग्रवाल हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड हे होते. यावेळी (पान २ वर)

धार्मिक रत्न पुरस्काराने गहिनीनाथ महाराज औसेकर सन्मानित

पंढरपूर / प्रतिनिधी- शिरोरे प्रतिष्ठान कामखेडा नाशिक यांच्या वतीने श्रीनाथ संस्थानचे सद्गुरु तथा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देवस्थान समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांना त्यांच्या धर्मकार्य आणि नाथ संस्थानच्या उल्लेखनीय सेवेबद्दल ..धार्मिक रत्न हा पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे.

शिरोरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री महेश शिरोरे,सचिव श्री रमेश शिरोरे, श्री. दत्तात्रय शिरोरे, श्री वासुदेव मुसळे, श्री जितेंद्र वेढणे, श्री दिलीप सोनवणे श्री निलेश मुसळे या प्रतिष्ठानच्या मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र पंढरीत हा धार्मिक रत्न पुरस्कार औसेकर महाराजांना देऊन त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे वारकरी संप्रदायातील योगदान नाथ संस्थानच्या गुरुपरंपरेतील आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देवस्थान समितीतील विशेष उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना पुरस्कार व सन्मान असून औसेकर महाराज म्हणजे, संप्रदायातील एक ऊर्जा व दिशा मार्गदर्शक देणारे व्यक्तित्व असे गौरउदगार शिरोळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री महेश शिरोळे यांनी पुरस्कार प्रदान प्रसंगी काढले. आषाढी वारीच्या पर्वात हा पुरस्कार महाराजांना मिळाल्याबद्दल समस्त वारकरी व शिष्य समुदायात आनंद व्यक्त होत आहे.

सोमनाथ स्वामी यांचे निधन

लातूर / प्रतिनिधी- सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते व जगतजागृती शिक्षण प्रसारण मंडळ चाकूरचे ज्येष्ठ सदस्य संचालक व कार्यकारी मंडळाचे खजिनदार सोमनाथ स्वामी यांचे आज दिनांक २६-७-२०२४ रोजी चाकूर येथे अल्पशा आजाराने निधन झाले. सायंकाळी ६ वाजता चाकूर येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब जाधव, आ. श्री. बाबासाहेब पाटील, श्री. विलासराव पाटील, श्री. बालाजीराव पाटील, डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे, डॉ. अशोक सांगवीकर, विठ्ठलराव माकणे, उपाध्यक्ष बिराजदार, नरेश पाटील, विक्रम पाटील, सौ. पुष्पा पाटील, अस्मिता पाटील, डॉ. नागने, डॉ. संजय स्वामी, अॅड. मळभागे, अनिल बाबासाहेब पाटील, शिवकुमार बाबासाहेब पाटील, बालाजी सुर्यवंशी, शिवप्रसाद शेटे, विनोद निला, सर्वोत्तमराव कुलकर्णी, शिवानंद हेंगणे, अनील वाडकर, अॅड, सुधाकर मोतीपवळे, सौ. प्रभावती मोतीपवळे, श्री. मन्मथ स्वामी, अनेक मान्यवर उपस्थित होते.

धोकादायक इमारती बाबत तात्काळ कारवाई करावी

लातूर/ प्रतिनिधी- मागच्या तीन चार दिवसात झालेला संतधार पाऊस आणि लातूर शहरातील नागरीकांकडून आलेल्या तक्रारीची दखल घेऊन आज सकाळी लातूर शहर महानगरपालीका कार्यालयात जाऊन प्रशासक असलेले आयुक्त व इतर अधिकाऱ्यांसमवेत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आढावा बैठक घेतली. शहरात स्वच्छता राखण्याच्यादृष्टीने वेळेत कचरा व्यवस्थापन करावे व नाले साफसफाईतील हलगर्जीपणा टाळावा, रोगराई पसरणार नाही याची दक्षता घ्यावी रस्त्यावरील खडडे ताबडतोब बुजवावेत, आदी सुचना आपण दिल्या असल्याचे बैठकीनंतर काँग्रेस भवन येथे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पत्रकार परीषद घेऊन सांगीतले.

पत्रकार परीषदेत बोलतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, स्थानीक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका अनेक दिवसापासून झाल्या नाहीत त्यामुळे लातूर महापालीकेत सुमारे अडीच वर्षापासून प्रशासकीय कारभार चालू आहे. प्रशासक म्हणजे शासकीय कारभार त्यामुळे नागरीकांच्या तक्रारीवरुन आज आपण महानगरपालीका कार्यालयात जाऊन आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीस लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त शुभम कयातमवार, उपयुक्त पंजाबराव खानसोरे, नगररचनाकर निकिता भांगे, शहर अभियंता नवनाथ केंद्रे, लेखाधिकारी रावसाहेब कोलगने, मुख्य लेखापरीक्षक तावडे, रमाकांत पिडगे, रुक्मानंद वडगावे सर्व क्षेत्रीय अधिकारी संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत महापालीकेच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या विविध योजना व उपक्रमाचा आढावा घेतल्यानंतर शहरातील हत्तेनगर भागात नळाव्दारे दुषीत पाणी पुरवठा होत असले बाबत तक्रारी आहेत त्यांची दखल घेऊन सर्वच ठिकाणी स्वच्छ निर्जंतुकीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा करावा, अमृत २ योजनेत मंजुर झालेले मांजरा धरणापासूनच्या शहरापर्यंतच्या पाईप लाईनचे काम त्वरीत पूर्ण करावे, शहरातील ऐतिहासीक वारसा असलेल्या इतारतीचे जतन (पान २ वर)

राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये वाचन अभियानास प्रारंभ

लातूर / प्रतिनिधी- राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमधील जिज्ञासू, कल्पकता आणि सर्जनशीलता विकसित व्हावी यासाठी महाराष्ट्र वाचन चळवळ उपक्रमांतर्गत महावाचन उत्सव २०२४ अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाचा प्रारंभ गुरुवारी माता सरस्वतीचे पूजन करून प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू यांच्या हस्ते स्कूलच्या ग्रंथालयात आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व आपल्या मातृभाषेविषयी आपली आवड निर्माण करावी आणि वाचन किती आवश्यक आहे याबद्दल सविस्तर माहिती दिली. आपली मातृभाषा सर्वांना आली पाहिजे त्याची माहिती सर्वांना असली पाहिजे यासाठी हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

हे अभियान २२ जुलै ते ३० ऑगस्ट राबविण्यात येत असून यामध्ये स्कूलच्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. गुरुवारी सकाळी वाचन अभियानाच्या उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांना मराठीची पुस्तके देऊन त्यांच्याकडून वाचन करून घेण्यात आले. विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले सर्व साहित्य ग्रंथ ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कार्यक्रमास मनोहर कबाडे, अरुल शेल्वी, विनोद चव्हाण, ग्रंथपाल संदीप केंद्रे, मनीषा वराडे, प्रेरणा कडतने, अश्विनी पाटील, विनिता पाटील, माधुरी भोसले व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनो जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकता : डि.बी. लोहारे गुरूजी

विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय, आलमला

औसा (प्रतिनिधी): तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील उन्हाळी परिक्षा २०२४ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा संस्थेच्या वतीने डि. बी. लोहारे गुरूजी यांच्या शुभहस्ते, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे, ब्ल्यु बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर, विभागप्रमुख प्रा. प्रविण साबदे, प्रा. रेवणसिध्द बक्का, प्रा. मंगेश बिडवे, प्रा. संदेश माडे, प्रा. अब्दुल समद काझी, प्रा. अजित लोकरे, प्रा. चंद्रशेखर चरकपल्ले यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी करताना संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासाबरोबरच गुणवत्ता वाढीसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी महाविद्यालयातुन देण्यात येत असलेल्या अत्याधुनिक सेवा सुविधांची माहिती देऊन महाविद्यालय सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे या निकालावरून दिसुन येत असल्याचे सांगितले. यामुळेच महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांचा ओढा असल्याचे सांगितले.

अध्यक्षिय समारोप करताना डि. बी. लोहारे गुरूजी यांनी गुणवंताचे कौतुक करून विद्यार्थ्यांनो तुम्ही कोणत्याही क्षेत्रात जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर तुम्हाला यश मिळविता येते असे सांगुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयामध्ये घेण्यात येत असलेल्या दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या फाउंडेशन बॅच मध्येही घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्याचाही पाहुण्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. परमेश्वर खंडागळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रभाकर कापसे यांनी केले.

भारतीय लष्करी सेवेत कार्यरत असल्याचा सार्थ अभिमान

देगलूर (प्रतिनिधी) : देशासाठी काहीतरी करण्याची मनीषा आरंभापासूनच मनात होती व आज भारतीय लष्करी सेवेत कार्यरत असल्याचा सार्थ अभिमान वाटतो असे मत सचिन वनंजे यांनी व्यक्त केले. जम्मू काश्मीर मधील कुपवाडा जिल्ह्यातील तंगधार येथे सचिन वनंजे हे लष्करी सेवेत कार्यरत आहेत.

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने प्रतिवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून आजी / माजी सैनिकांचा सत्कार केला जातो. वनंजे या कार्यक्रमात प्रमुख सत्कारमूर्ती व मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या आरंभी वै. धुंडा महाराज देगलूरकर व अशोकस्तंभ प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी तसेच इतिहास विभागाचे प्रा. गंगाधर देशमुख, प्रा. मारोती सोनकांबळे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना सचिन वनंजे यांनी लष्करातील युद्धजन्य परिस्थिती, प्रत्यक्ष युद्धप्रसंग, सीमेवरील चकमकी, इत्यादी अनुभवाचे कथन करून महिला वर्गांना (विद्यार्थिनींना) लष्करी सेवेत असलेल्या संधी बद्दल मार्गदर्शन केले. देगलूरच्या सुपुत्राची तंगधार जिल्हा कुपवाडा (जम्मू काश्मीर) येथील लष्करी सेवा ही देगलूरवासियांसाठी गौरवास्पद बाब असून वनंजे यांच्या सारख्या तमाम सैनिकांच्या लष्करी सेवेमुळे आपण भारतीय नागरिक अंतर्गत भागात सुरक्षितता अनुभवत असतो, असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी व्यक्त केले. प्रास्ताविकातून डॉ. गंगाधर देशमुख यांनी कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा कथन केली. तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. मारोती सोनकांबळे यांनी करून दिला. यावेळी कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन येरेवाड नारायण या विद्यार्थ्याने केले तर कु. कंदुलवार वर्षा या विद्यार्थिनीने आभार मानले. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

शिरूर अनंतपाळ काँग्रेस पक्षाचा बुथप्रमुख व पदाधिकारी मेळावा संपन्न

प्रशांत तांबोळकर

शिरूरआनंतपाळ : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष श्री.नानाभाऊ पटोले,महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आ.अमितभैया देशमुख,आ.धिरज देशमुख साहेब, लातूर लोकसभा निरीक्षक तथा माजी.आ.रामहरी रुपनवर,लोकसभा निरीक्षक श्री.जितेंद्रजी देहाडे,यांच्या सूचनेनुसार निलंगा विधानसभा निरीक्षक संतोष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व निलंगा विधानसभा मतदार संघाचे नेते डॉ.अरविंद भातांब्रे यांच्या वतीने शिरूर-अनंतपाळ तालुक्यातील व शहरातील बूथप्रमुख व कार्यकर्ता बैठकीचे आयोजन शिरूर अनंतपाळ शहरात करण्यात आले होते.

RushiVV
Jul 25, 2024, 14:52

या मेळाव्यासाठी प्रदेश सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर, प्रदेश सचिव अभय साळुंके,पंकज शेळके, चक्रधर शेळके, विजयकुमार पाटील, तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील, युवक तालुकाध्यक्ष अँड सुतेज माने, शहराध्यक्ष अशोक कोरे, किसान सेलचे जिल्हाध्यक्ष संजय बिराजदार, महिला तालुकाध्यक्षा सौ. मिनाताई बंडिले आदी मान्यवर उपस्थित होते.या बैठकीत येणाऱ्या विधानसभा निवडणूक लक्षात घेता निलंगा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीतील मित्र पक्षाला सोबत घेऊन लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित भैय्या देशमुख यांच्या नेतृत्वाखाली निलंगा विधानसभा मतदारसंघात आपण सर्वांनी एकजुटीने काम करून काँग्रेस पक्षाचा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे असे आव्हान निलंगा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेस पक्षाचे नेते डॉ अरविंद भातांब्रे यांनी व्यक्त केले या प्रसंगी अशोकराव पाटील,अभय साळुंके, चक्रधर शेळके यांनी मनोगत व्यक्त केले.या प्रसंगी अनेक युवकांनी व महिलांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.या मेळाव्याचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील यांनी केले व आभार अशोक कोरे यांनी मानले तर सुत्रसंचलन संजय बिराजदार यांनी केले या वेळी मोठ्या संख्येने बुथप्रमुख, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते या मेळाव्यासाठी सोमेश्र्वर तोंडारे, शिवदास उंबरगे, प्रतीक पारशट्टे, रमेश सोनवणे, डॉ.वैभव हासबे, पप्पु धुमाळे, मुन्ना बरबटले आदींनी परिश्रम घेतले.

पान १ वरून

भारत उद्धटपणाला....

विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधींनी ही शहीद जवानांना श्रध्दांजली अर्पण केली आहे. राहुल गांधींनी भारताच्या रक्षणासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या अमर हुतात्म्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या या सर्वोच्च बलिदानासाठी देश त्यांचा सदैव ऋणी राहील. अशी पोस्ट करून शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

गाझामधील...

सर्व नियम मोडले गेले आहेत. गाझामध्ये होत असलेल्या नरसंहाराकडे आंतरराष्ट्रीय समुदाय आंधळेपणाने पाहत असल्याचा आरोप त्यांनी केला होता.

काँग्रेस नेते ...

या प्रकरणाची पुढील सुनावणी १२ ऑगस्ट रोजी होणार असून, फिर्यादीच्या वकिलामार्फत पुरावे सादर केले जातील.

सशक्त...

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्र्वनाथ कराड, कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, डॉ. के. गिरीसन आणि प्रा.परिमल माया सुधाकर उपस्थित होते.

या सोहळ्यात देशातून द्वितीय आलेले अनिमेष प्रधान यांना ७५ हजार रूपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. त्याच बरोबर १६० यशस्वितांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. शाल, मानपत्र असे सत्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर भाषण डॉ.आर.एम. चिटणीस यांनी केले. प्रा.डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के. गिरीसन यांनी आभार मानले.

धोकादायक...

करुन धोकादायक इमारती बाबत तात्काळ योग्य ती कारवाई करावी, बांधकाम परवाना मिळण्यासाठी होणारी नागरीकांची हेळसांड थाबविण्यासाठी या कामात सुसुत्रता व पारदर्शकता आणावी, अनधिकृत गुठेवारी प्रकरणी फेरचौकशी करुन या कामात पारदर्शकता व सुसुत्रता आणावी, वाहतुक कोडी सोडविण्यासाठी रस्त्यावरील अतिक्रमणे दुर करावीत, रिंगरोड वरील सर्व्हीसरोड पार्कींग झोन होणार नाहीत याची काळजी घ्यावी, नोपार्कींग मधील वाहनावर कार्यवाही करणाऱ्या कर्मचारी कामगारांना विनम्रतेचे प्रशिक्षण दयावे, पर्यावरण संरक्षणासाठी शहरात सीटीबस, ऑटोरीक्षा व इतर सार्वजनीक वाहतुक व्यवस्था इलेक्ट्रीक किंवा सीएनजीवर चालवण्याची व्यवस्था होईल का ते पहावे, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उडडानपुलाच्या विस्तारासंबंधी मागील जिल्हाधिकारी यांनी मांडलेली कल्पाना प्रस्ताव रुपाने शासनाकडे पाठवावी, शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत रहाण्यासाठी आणखी बहुमजली वाहनतळाचे प्रस्ताव तयार करावे, शहरातील युनीपोल उभारणी करतांना नियमात तडजोड तर केली नाही याची चौकशी करुन शहराचे विदुपीकरण थांबवावे, शहरातील भटक्या प्राण्याचा योग्य बंदोबस्त करावा, साई पर्यटन केंद्र येथे श्वानासाठी उभारलेले लसीकरण केंद्र इतरत्र हालवावे, कचरा डेपोसाठी शहरापासून तसेच शहरानजीकच्या गावापासून म्हणजे मानवीवस्तीपासून दुर कचराडेपो उभारावेत, भुमिगत गटार योजनेसाठी खोदलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी मोहीम राबवावी, गावभागातील रस्तयाच्या मजबुतीकरणासाठी भुमिगत गटार योजनेसह नव्याने अराखडा तयार करावा आदी सुचना केल्या असल्याचे आमदार देशमुख यांनी सांगीतले.

लातूर शहरातील गावभागात विलासराव देशमुख शासकीय वैदयकीय महाविदयालयाच्या वतीने १०० कोटी खर्च करुन १०० बेडचे रुग्णालय उभारण्यात येत आहे त्या बांधकामात येणाऱ्या अडचणी त्वरीत दूर कराव्यात, लातूर शहरानजीक जिल्हारुग्णालय उभारण्यात येत असलेले सर्व अडथळे दुर झाले आहेत. शहरात उभारण्यात आलेल्या शादीखानाचे काम पूर्ण झाले आहे त्यांच्या नियमीत व्यवस्थापनाची व्यवस्था करण्यात यावी आदी सुचनाही या बैठकी दरम्यान आपण दिल्या आहेत असे आमदार अमित देशमुख यांनी सांगीतले.

या बैठकी दरम्यान केलेल्या सर्व सुचनांची नोंद आयुक्त बाबासाहेब मनोहरे, यावेळी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यासह उपस्थित असलेले अतिरिक्त आयुक्त शुभम कयातमवार, उपयुक्त पंजाबराव खानसोरे, नगररचनाकर निकिता भांगे, शहर अभियंता नवनाथ केंद्रे,लेखाधिकारी रावसाहेब कोलगने, मुख्य लेखापरीक्षक तावडे, रमाकांत पिडगे,रुक्मानंद वडगावे सर्व क्षेत्रीय अधिकारी यांनी घेतली असुन त्यावर गाभीर्यपुर्वक कारवाई करण्याची ग्वाही त्यांनी दिली असल्याची माहीती आमदार देशमुख यांनी पत्रकार परीषदे दरम्यान दिली. काँग्रेस भवन येथे झालेल्या पत्रकार परीषदेत जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, शहर जिल्हा अध्यक्ष ड. किरण जाधव, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, विलास को ऑपरेटीव्ह बॅकेचे उपाध्यक्ष समद पटेल, माजी महापौर दिपक सुळ, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, माजी उपमहापौर कैलास कांबळे, लातूर जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा शीलाताई पाटील, काँग्रेसचे उदगीर विधानसभेचे निरीक्षक रवींद्र काळे, प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, सचिन बंडापले, व्यंकटेश पुरी, रविशंकर जाधव, रमेश सूर्यवंशी, राम स्वामी, विजयकुमार साबदे, बालाजी साळुंके आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

दीपस्तंभ : पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरुजी

महाराष्ट्राला थोर अशी शिक्षणाची परंपरा लाभलेली आहे,याच परंपरेत मूल्यात्मक शिक्षण देऊन एखाद्या वादळात दिवा लावावा,अशाप्रकारचे कार्य मोहेकर गुरुजींनी करून दाखविले आहे.राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक चिरंतन मूल्यांचे पाईक,शिक्षणातून सर्वांगीण परिवर्तनासाठी प्रयत्न करणारे,तत्वनिष्ठ आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजेच ज्ञानतपस्वी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी (आण्णा) यांची आज दि.२७/०७/२०२४ रोजी ९७ वी जयंती. आकाशाचे भव्यत्व आणि सूर्याची तेजस्विता पेरणारे गुरुजी यांनी फोडिले विद्येचे भांडार ख करण्या बहुजनांचा उद्धार याप्रमाणे कार्य केले, आपल्या ध्येयातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी आयुष्य खर्ची घालणारे मूल्यशिक्षणाचे प्रेरक म्हणून त्यांचा नामोल्लेख करावा लागतो.

संघर्षमय बालपण आणि शिक्षण:- महाराष्ट्राचे कुलदैवत, तुळजाभवानी मातेचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यातील मोहा येथे २७ जुलै १९२७ रोजी एका संस्कारसंपन्न शेतकरी कुटूंबात त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव ज्ञानदेव भाऊराव मोहेकर.घरची सामान्य परिस्थिती बेताचीच कुटुंब निरक्षर असे असले तरी आईची आपल्या मुलाने खूप शिकावे,ही उत्कंठ इच्छा त्याकरिता आईने एक समई विकत घेतली,माझा मुलगा शिकेल व पोथी वाचेल अशी उदात्त त्यामागची प्रेरणा, आण्णांनी सार्थ करून दाखविली. बालपणीच आईचे कृपा छत्र हरवले,अगदी अडीच वर्षापासून त्यांना आईविना जीवन जगण्यास सुरुवात करावी लागली.वडील परंपरागत धार्मिक, परोपकारी वृत्तीचे सद्गृहस्थ होते.तेच अनुवंशिक संस्कार त्यांच्यावर झाले.

बालपणापासूनच शिक्षणाची विलक्षण आवड असल्याने दहावीपर्यंतचे शिक्षण मामाच्या गावी, कसल्याही प्रकारची शैक्षणिक पार्श्र्वभूमी नसताना जिद्द व आत्मविश्र्वासाच्या बळावर सदैव यश संपादन करून हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठातून बी.एस्सी. (कृषी) पदवी संपादन केली.शिक्षण पूर्ण झाल्यावर उच्च शिक्षणासाठी परदेशी जावे, उच्च पदाची नोकरी करावी किंवा राजकारणात प्रवेश करावा,असा कोणताही विचार न करता ग्रामीण भागात राहून शिक्षकी पेशा स्वीकारावा,शेतकऱ्याची परिस्थिती,सर्वसामान्यांचा उद्धार करावा याच हेतूने ज्ञानदानाचे कार्य केले. शिक्षण हे पवित्र कार्य ,त्याद्वारेच खरे समाजपरिवर्तन होते, असा दृढ विश्र्वास त्यांना होता.

सामाजिक व शैक्षणिक कार्य: तुम्हाला काही महिन्यांसाठी तरतूद करायची असेल तर धान्य पेरा, काही वर्षांसाठी तरतूद करायची असेल तर फळझाडे लावा आणि अनेक पिढ्यांसाठी तरतूद करायची तर माणसे पेरा. म्हणीप्रमाणे कार्य करत अज्ञान,अंधश्रद्धा आणि दारिद्र्यात अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी मराठवाड्याच्या मातीवर येरमाळा ता.कळंब येथे २५ सप्टेंबर १९५१ रोजी ज्ञान प्रसारक मंडळ संस्थेची स्थापना अण्णांनी केली. या संस्थेचे बोधचिन्ह म्हणून समई तर स्वावलंबी शिक्षण संत नामदेवांचे ज्ञानदीप लावू जगी हे संस्थेचे बोधवाक्य सार्थ ठरले.

शिक्षण संस्थेचे वटवृक्षात रूपांतर: महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षी वि.रा.शिंदे,कर्मवीर भाऊराव पाटील,डॉ.बापूजी साळुंखे,डॉ.पंजाबराव देशमुख आणि कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या समाजोपयोगी शैक्षणिक चळवळी व विचार कार्याच्या प्रेरणेतून ते अधिक प्रभावित झाले.शिक्षण आणि श्रम यांच्यात समन्वय घडविण्याचा प्रयत्न केला,कमवा

व शिका हे सूत्र समोर ठेवूनच११जून१९५४ मध्ये ज्ञानोद्योग विद्यालयाची स्थापना केली, तसेच ग्रामीण भागातील गोर गरिबांच्या मुलांची उच्चशिक्षणाची सोय व्हावी,यासाठी संस्थेंतर्गत १५ जून१९६९ मध्ये ज्ञान प्रसारक महाविद्यालयाची,कळंब (तेच शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,नावाने ओळखले जाते.)येथे स्थापना केली.कित्येक मुलांना त्यांनी आपल्या खांद्यावरुन वसतिगृहात आणले अण्णांची वसतिगृहयुक्त शाळा म्हणजे सामाजिक परिवर्तनाचा मानबिंदू होता. मराठवाड्यातील ग्रामीण शिक्षण चळवळीचे प्रणेते म्हणून मोहेकर गुरुजींचा उल्लेख केला जातो. ज्ञानेश्र्वर माऊलीच्या शब्दांत, इवलेसे रोप लावियेले द्वारी ख त्याचा वेलू गेला गगनावरी या भव्यदिव्य शैक्षणिक कार्यामध्ये ज्ञानदेव व सुमनबाई या दाम्पत्याचे खूप मोठे योगदान व त्याग आहे. अनेक संकटांचा सामना खंबीरपणे व नेटाने करत बहुजनांच्या शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. मानवी मूल्य ढळू न देता समाजहित व देश विकासाचे अलौकिक कार्य करणारी महान विभूती म्हणजे शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी होत.वटवृक्षाप्रमाणे त्यांच्या अनेक शाखा कार्यरत आहेत,त्यातून के.जी.टू पी.जी. अशी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे,कळंब,वाशी,परंडा,औसा आणि लातूर तालुक्यात संस्थेच्या शाखा यांत एक वरिष्ठ महाविद्यालय, चार कनिष्ठ महाविद्यालय,दहा माध्यमिक विद्यालय, दोन प्राथमिक विद्यालये,सुविधांयुक्त विद्यार्थी-विद्यार्थिनी वसतिगृह, तीन कर्मचारी पतसंस्था आणि ग्राहक भांडार इ.विविध ठिकाणी कार्यरत आहेत, ग्रामीण भागातील शैक्षणिक चळवळीतील एक सुवर्ण पान असलेल्या ज्ञान प्रसारक मंडळ शिक्षण संस्थेचा नुकताच सुवर्ण महोत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला, अण्णांनी लावलेल्या छोट्या रोपट्याचे रुपांतर २०१९-२० अखेर विविध शाखेत ७५६ कर्मचारीवृंद असणाऱ्या डेरेदार वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

महत्त्वाच्या घटना व प्रसंग: आण्णा सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी अनंत खस्ता खात,कष्ट सोसत असतं. त्यांचा प्रामाणिकपणावर प्रचंड विश्र्वास होता,प्रसंगी डोक्यावर शिरस्त्राण नाही. पायात पायतनही नाही,अशा अवस्थेत रानोमाळ भटकत अण्णांनी गोर-गरीब,श्रीमंत अशा सर्वच स्तरातील मुले गोळा केली.त्यातूनच सुंदर कर्तबगार अशी जीवनशिल्पे घडविली.प्रारंभी मोहा येथे एक वसतिगृह सुरु केले.त्याकाळी अनुदान नव्हते. मुलांच्या जेवणाची सोय व्हावी म्हणून गुरुजी व त्यांचे सहकारी गावोगावी फिरून ज्वारी,डाळ,तांदूळ जमा करून विद्यार्थ्यांच्या जेवणाचा प्रश्न सोडवित असत तसेच त्याकाळी स्वयंपाकी मिळणे कठीण होते,यासाठी गुरुजी भल्यापहाटे उठून विद्यार्थ्यांसाठी स्वत: भाजी-भाकरी तयार करत.योगायोगाने त्याच वर्षी ग्रामपंचायतीची स्थापना झाली आणि निवडणूक न घेता लोकांनी सरपंचपदी बिनविरोध निवडून दिले आणि गावच्या कारभाराचीही जबाबदारी त्यांच्यावर आली.त्यांच्या या समग्र शैक्षणिक कार्यात त्यांच्या पत्नी सुमनबाईंची खंबीर साथ होती. याचेच फलित या शिक्षण संस्थेतून शिक्षण घेऊन विद्यार्थी आज राज्याच्या कार्यालयात पदावर विविध कार्यरत आहेत.

अण्णांचा गौरव व सन्मान:- शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी उर्फ अण्णांच्या सामाजिक तळमळीने केलेल्या शैक्षणिक ज्ञानमंदिरातून आज हजारो विद्यार्थी ज्ञानसंस्काराचे धडे प्राप्त करत आहेत.त्यांच्या यशस्वी जीवन कार्यामुळे अभ्यासकांनी, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांच्या कार्याबद्दल अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे.अमेरिकेतील मिस न्यूमन या बाईंनी संस्थेला भेट देवून कार्याची प्रशंसा केलीच पण देणगीही दिली,१९९० मध्ये श्रीमती राजमाता नेमगोंडा पाटील ट्रस्ट, सांगली यांचा जनसेवा पुरस्कारही मिळालेला होता. अण्णांचे हे दीपस्तंभासारखे कार्य जनतेच्या सदैव स्मरणात राहील. अशा आयुष्यभर नि:स्वार्थ शिक्षण प्रचार आणि प्रसाराचे कार्य करणाऱ्या शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर गुरुजी तथा अण्णांनी वयाच्या ६४ व्या वर्षी ३० ऑगस्ट १९९१ रोजी या जगाचा निरोप घेतला. शिक्षणाची ज्ञानगंगा उपेक्षित,बहुजनांच्या झोपडीपर्यंत आणणारे आधुनिक भगीरथ, साधी राहणी उच्च विचारसरणी हा त्यांचा आदर्श होता.मोहेकर गुरुजी हे पदामुळे मोठे झाले नव्हते, तर ते स्वत:च्या कर्तुत्वामुळे मोठे झाले,एक आदर्श शिक्षक, आदर्श मुख्याद्यापक व आदर्श संस्थाचालक होते, अशा या आदर्श थोर व्यक्तिमत्वास कोटी कोटी प्रणाम!!

- प्रा.डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी
(मराठी विभाग)
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर
महाविद्यालय,कळंब
मो.९४२०९५८६९९

उळेकर व बडुरे यांचा समाजभूषण पुरस्काराने सन्मान

तुळजापूर दि.२६ (प्रतिनिधी) - येथील उद्योजक लक्ष्मणराव उळेकर व सामाजिक कार्यकर्ते गुरुनाथ बडुरे यांना समाजभूषण पुरस्काराने नांदेड येथील गोपाळचावाडी येथे गुरुपौर्णिमेनिमित्त केदारपिठाचे जगद्गुरु भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन पुरस्काराने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, कर्नाटकचे मंत्री एस.एस. मल्लिकार्जुन, खा प्रभा मल्लिकार्जुन, खा वसंतराव चव्हाण, खा सुरेश शेटकर, माजी आमदार अमिता चव्हाण, शिवा संघटनेचे प्रा.मनोहर धोंडे आदी मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल उळेकर व बडुरे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

शेतकरी महिलांना ट्रॅक्टरसह इतर कृषी साहित्याचे वाटप

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – एसबीआय फाउंडेशन व स्वयंम शिक्षण प्रयोग यांच्या संयुक्त विद्यमाने मंजिरी सखी प्रोड्युसर लि. कंपनीस ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रेलर व पेरणी यंत्र आदी कृषी यंत्र सामग्रीचे वाटप करण्यात आले. वाटप करण्यात आलेल्या कृषी यंत्रामुळे महिला शेतकरी सभासदांचे आणि इतर शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या सर्व यंत्र सामग्री मंजिरी सखी प्रोड्युसर कंपनी लि. कंपनीकडून स्वस्त दरामध्ये मिळतील. त्यामुळे महिला शेतकऱ्यांच्या कृषी उत्पन्नामध्ये सुधारणा होईल आणि त्यांचे जीवनमान उंचावेल. कृषी यंत्र वाटप करतेवेळी जिल्हा कृषी अधीक्षक रवींद्र माने, आत्माचे संचालक सराफ, बी. टी.एम. नागेश उगलमुगले, स्वयंम शिक्षण प्रयोगचे किरण माने, तब्बसुम मोमीन, देवकण्या जगदाळे, गोदावरी डांगे, सीमा सय्यद, शहेदा मुजावर, दीपक लांडगे, स्वप्नाली सावळे, संतोष होनराव व मंजिरी सखीचे संचालक दिपाली थोडसरे, कोमल कटकटे आदींसह मंजिरी सखीच्या सभासद महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी २७० वाहनांची केली तपासणी

मद्यपी ५ चालकांवर वायु वेग पथकाची धडक कारवाई

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्यावतीने २७० वाहनांची तपासणी करण्यात आली. या तपासणी दरम्यान पाच मद्य प्राशन करणारे चालक आढळून आले. त्यामुळे त्यांच्यावर मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्या प्रकरणी दंडात्मक कारवाई दि.२५ जुलै रोजी करण्यात आली. दरम्यान, रस्त्यावर होणारे अपघाताचे प्रमाण आटोक्यात आणण्यासाठी वायु वेग पथक क्शन मोडमध्ये असल्याचे दिसून येत आहे.

धाराशिव येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने रस्त्यावर होणारे अपघाताचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी सतत वाहनांच्या वेगाची तसेच वाहन चालविणाऱ्या चालकांकडे आवश्यक ते सर्व कागदपत्र सोबत बाळगलेली आहेत किंवा नाही ? व चालकाने मद्यप्राशन केले आहे किंवा नाही ? याची पाहणी वायु वेग पथकाच्या माध्यमातून केली जाते. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील वायु वेग पथकाच्या अधिकाऱ्यांनी धाराशिव सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी टोल नाका येथे २७० रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी केली. या दरम्यान, २७० वाहन चालविणाऱ्यांपैकी ५ पाच जण मद्य प्राशन करून वाहन चालवीत असल्याचे निदर्शनास आले. दारू पिऊन म्हणजेच मद्य प्राशन करून वाहन चालविल्यामुळे अपघात होतात. त्यामुळे स्वतः चालक, प्रवासी, पादचाचारी व रस्ता वापरकर्त्यांच्या जीवाला धोका होण्याचा संभव असतो. कारण नशेमध्ये वाहन चालविल्यास वाहनावर नियंत्रण मिळविणे अवघड होऊन बसते. वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे वाहनावर नियंत्रण मिळविण्यास तो अपयशी ठरतो. त्यामुळे अपघात, दुखापत व मृत्यू देखील होऊ शकतो. विशेष म्हणजे मद्य प्राशन करून वाहन चालविणे हा कायद्याने अतिशय गंभीर गुन्हा आहे. त्यामुळे या तपासणी दरम्यान आढळलेल्या ५ मद्यपी वाहन चालकांवर धडक कारवाई करण्यात आली आहे. ही धडाकेबाज कारवाई उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मोटार वाहन निरीक्षक महेश रायबान, दत्तात्रय पांडकर, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अजित पवार, सुजित वाघमारे, अक्षय बंदर, सोहेल मुजावर, वाहन चालक गोरख बोधले व निलेश खराडे यांनी केली.

मुस्लिम समाजाला मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी निधी मंजूर करावा – आ. चौगुले

उमरगा दि.२६ (प्रतिनिधी) – उमरगा – लोहारा तालुक्यातील ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाच्या मागणीनुसार आवश्यक महत्त्वाच्या कामांसाठी निधी मंजूर करावा अशी मागणी आ.ज्ञानराज चौगुले यांनी महाराष्ट्र राज्याचे अल्पसंख्यांक विभागाचे मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे मुंबई येथे केली आहे.

उमरगा – लोहारा तालुक्यातील विविध गावांमध्ये अल्पसंख्यांक समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्यास असून त्यांच्यातून मुस्लिम कब्रस्तानास संरक्षक भिंत बांधकाम करणे, मुस्लिम वस्त्यांमध्ये शादीखाना, सभागृह बांधकाम करणे, कब्रस्तानाकडे जाणारा रस्ता करणे यांसह विविध मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी अल्पसंख्यांक विभागाककडून तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच यापूर्वीही आ चौगुले यांच्या माध्यमातून तालुक्यातील विविध गावांतील मुस्लिम समाजबांधवांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी सुमारे ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या निधीतून गावोगावी अनेक विकासकामे पूर्ण झाली असून काही कामे अद्याप प्रगतीपथावर आहेत.



पीक विमा देऊन ते जाचक पत्रक रद्द करण्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा थकलेला पीक विमा शेतकऱ्यांना देण्यात यावा. तसेच दि.३० एप्रिल २०२४ रोजी प्रधानमंत्री कार्यालयाने पीक विमा संदर्भात काढलेले पत्रक रद्द करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने पीक विम्यासाठी लढा देणारे अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लाक्षणिक धरणे आंदोलन दि.२६ जुलै करण्यात आले.

धाराशिव जिल्ह्यातील खरीप २०२३ संदर्भातील केंद्र शासनाचे ३० एप्रिल २०२४ चे परिपत्रक रद्द करुन जुन्या परित्रिकाप्रमाणे पीक नुकसान भरपाई देण्यात यावी. तर धाराशिव तालुक्यातील सांजा येथील देवस्थान जमिनीवरील खंड भरण्यासाठी महसूल प्रशासनाने मनाई केली आहे. त्या संदर्भात मंत्रालयात याचिका प्रलंबित असून त्या याचिकेवर त्वरीत सुनावणी घेण्यात यावी. तसेच कांदा अनुदान, प्रोत्साहन अनुदान, दुध अनुदान, सततच्या पावसाचे अनुदान, दुष्काळ अनुदान व तुषार संच अनुदान तातडीने शेतकऱ्यांना देण्यात यावे. तर रब्बी हंगाम २०२३ मधील पीक विमा शेतकऱ्यांना तातडीने वाटप करण्यात यावा. तसेच के. वाय.सी प्रक्रिया सुलभ करुन शेतकऱ्यांना अनुदान वितरीत करण्यात आदी मागण्यासाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले. या मागण्या दि. ६ ऑगस्टपर्यंत मान्य करण्यात याव्यात. अन्यथा शेतकऱ्यांच्यावतीने जिल्ह्यात

७ ऑगस्टपासून प्रत्येक तालुक्यात रास्ता रोकोचा इशारा

दि.७ ऑगस्टपासून ८ तालुक्यात रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे. यावेळी अनिल जगताप, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस डॉ प्रतापसिंह पाटील, युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणा सलगर, युवक प्रदेश सरचिटणीस आदित्य गोरे, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, काँग्रेस कमिटीचे जिल्हा कार्याध्यक्ष खलील सय्यद, चंद्रकांत सुर्यवंशी, मुकुंदराव सुर्यवंशी, इसाक शेख, गुणवंत शिंदे, दिनकर सुर्यवंशी, रमेश आवटे, हनुमान सुर्यवंशी, धनंजय शिंदे, वासुदेव सुर्यवंशी, दीपक सुर्यवंशी, दीपक मेंढे, बाबासाहेब लोंढे, भुजंग शिंदे, दशरथ काशीद, किशोर शिंदे, सुधाकर सुर्यवंशी, अशोक सुर्यवंशी, बाळू अनभुले, बबन लोकरे, गफूर शेख, भुजंग सुर्यवंशी, दिलीप गुरव, सचिन वाघमारे, सतीश मोरे, रमेश आवटे, जयंत देशमुख, विश्वास सुर्यवंशी, गुलाबराव नाईकल, नाना अंगटकर, सचिन साबळे, धर्मराज सुर्यवंशी, आप्पा अंबडकर, सुनील पवळे, रणजीत सुर्यवंशी, श्रीधर सुर्यवंशी, पंकज सुर्यवंशी आदींसह महिला व पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सैनिक कल्याण कार्यालयात कारगिल विजय दिवस साजरा

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात शहीद जवान स्मारक प्रतिकृतीस (अमर जवान) मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कारगिल विजय दिवस दि.२६ जुलै रोजी साजरा करण्यात आला.

भारताच्या कारगिल भागात सन १९९९ मध्ये पाकिस्तानच्या सैनिकांनी केलेले आक्रमण भारतीय शूर सैनिकांनी त्यांच्या साहसाने व धाडसाने खांद्याला खांदा लावून शत्रूशी झुंज देऊन यशस्वीरित्या परतवून लावले. या युद्धास आज दि. २६ जुलै रोजी २५ वर्ष पूर्ण होत आहेत. या विजय दिवसाच्या अनुषंगाने शहीद सैनिकांच्या कुटुंबियांचा व दिव्यांग जवानांचा वेगवेगळ्या स्तरावर गौरव करून त्यांच्या प्रती शासन आणि समाजातर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात करण्यात येत आहे. या शूरवीरांच्या त्यागामुळेच आपले भवितव्य सुरक्षित आहे. याची आठवण समाजास करून देण्यात येत आहे. कारगिल युद्धात शहीद झालेल्या शूर सैनिकाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा...कारगिल विजय दिवस...साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमास जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. उपस्थित मान्यवरानीही पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. वीर पत्नी, वीर माता, वीर पिता यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित माजी सैनिक, माजी सैनिक विधवा यांचाही गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष शिफा व शेतकरी संघटनेचे राघुनाथ दादा पाटील, प्रमुख उपस्थिती होती.नारायण अंकुशे,राष्ट्रीय अध्यक्ष,भारतीय जवान किसान पार्टी, रावसाहेब जावळे, माजी सैनिक संघटना अध्यक्ष, धाराशिव व माजी सैनिक अशोक गाडेकर, जिल्ह्यातील ७ वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, ३२ माजी सैनिक/माजी सैनिक विधवा व अवलंबित तसेच १० इतर कार्यालयातील माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे गुरुनाथ कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार अनिलकुमार मँगशेट्टी यांनी मानले.

शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करा अन्यथा आंदोलन

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – शहरातील मुख्य मार्गावरील रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. अन्यथा तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा शिवसेना (ठाकरे) पक्षाच्यावतीने सर्व बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना दि.२६ जुलै रोजी देण्यात आला आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राजमाता जिजाऊ चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक व मध्यवर्ती बस स्थानक ते भवानी चौक – सांजा नाका रहदारीच्या रस्त्याची प्रचंड मोठी दुरवस्था झालेली आहे. रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे अपघात होत आहेत. या रस्त्यावर शाळा व कॉलेज असल्यामुळे विद्यार्थ्यांना रस्त्यावरून ये-जा करताना नाहक त्रास होत आहे. त्यामुळे आतापर्यंत छोटे-मोठे अपघात देखील झाले आहेत. हा रस्ता शहरात प्रवेश करण्याचा मुख्य रस्ता असल्यामुळे सर्वसामान्य वयोवृद्ध व विद्यार्थी यावरून प्रवास करतात. त्यामुळे रस्त्याची लवकरात लवकर दुरूस्ती करून नागरिकांची गैरसोय टाळावी अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी शहरप्रमुख सोमनाथ गुरव, माजी नगरसेवक सिद्धेश्वर कोळी, प्रदीप मुंडे, राणा बनसोडे, उपशहर प्रमुख बंडू आदरकर, राकेश सुर्यवंशी, नाना घाटगे, जगदीश शिंदे, गणेश साळुंके, संकेत सुर्यवंशी, अमित उंबरे, मनोज उंबरे, सुमित बागल, ओम जाधव, सतीश लोंढे, संदीप शिंदे, यशवंत शहापालक, वैभव पाटील, राकेश कचरे, बालाजी मगर, राजदीप गायकवाड, महेंद्र शिंदे, पृथ्वीराज देडे, प्रवीण केसकर, सुनील कुंभार, योगेश गरड, सिद्दिक तांबोळी, राम झाडके आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

उद्या परंडा येथे अॅड. बाळासाहेब आंबेडकर यांची जाहीर सभा – रणबागुल

परंडा दि.२६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्रामध्ये एससी, एसटी व ओबीसीच्या आरक्षण बचावसाठी वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून जनजागृती यात्रा सुरू आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांची परंडा येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण रणबागुल यांनी दि.२६ जुलै रोजी दिली.

वंचित बहुजन आघाडीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अखिल भारतीय समता परिषद जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष आप्पासाहेब तरटे, ओबीसी नेते तथा जिल्हा काँग्रेसचे सचिव नितीन गाढवे, मी वडार महाराष्ट्राचा जिल्हाध्यक्ष अविनाश इटकर, श्रीमंत शेळके, भाजपाचे युवा जिल्हा उपाध्यक्ष शहाजी सोलंकर, ओबीसीचे भारत पवार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना रणबागुल म्हणाले की, वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एससी, एसटी व ओबीसीच्या आरक्षण बचाव यात्रा सुरू करण्यात आली आहे. यासाठी सभा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तसेच एससी, एसटी व ओबीसी आरक्षण वाचले पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. तर एससी, एसटी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुप्पट झाली पाहिजे. ओबीसी विद्यार्थ्यांना सुद्धा एससी, एसटी विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती मिळते. ती जशीच्या तशी लागू झाली पाहिजे. एससी, एसटी आणि ओबीसीला पदोन्नतीतील आरक्षण मिळाले पाहिजे. अनुसूचित जातीच्या जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी मिळणारी आर्थिक मदत बंद असून ती पूर्ववत चालू ठेवावी यासह इतर मागण्यांसाठी प्रकाश आंबेडकर यांची २८ जुलै रोजी दुपारी २ वाजता परंडा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आली असल्याची माहिती रणबागुल यांनी दिली. यावेळी फुले आंबेडकर विद्वत सभेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक प्रा डॉ शहाजी चंदनशिवे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव धनंजय सोनटक्के, जिल्हा सहसचिव मोहन बनसोडे, जिल्हा सदस्य तानाजी बनसोडे, तालुकाध्यक्ष तानाजी जाधव, तालुका सहसचिव राहुल पवार, तालुका उपाध्यक्ष मधुकर सुरवसे आदी उपस्थित होते.

शिष्यवृत्तीसाठी महा-डिबीटीवर अर्ज नोंदणी सुरू

अर्ज प्रलंबित राहील्यास मुख्याध्यापक जबाबदार

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) – अनुसूचीत जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती योजने अंतर्गत महा-डिबीटी पोर्टल प्रणालीवर शाळा व विद्यार्थ्यांची अर्ज नोंदणीची प्रक्रीया सुरु आहे. या प्रक्रियेत जिल्ह्यातील १२.६६ टक्के शाळांच्या नोंदणीचे काम पुर्ण झाले आहे. १८६४ शाळापैकी २३६ शाळांनी महा-डिबीटी पोर्टल प्रणालीवर शाळा नोंदणी प्रक्रीया पुर्ण केली आहे. उर्वरीत १६०८ शाळांनी शाळा नोंदणीची कार्यवाही तात्काळ पुर्ण करावी.

शिष्यवृत्ती योजना या म्यॅनुअली, ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत होत्या. परंतू सन २०२४-२५ पासून या योजना राबविण्यासाठी महा-डिबीटी पोर्टल प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. जिल्हयातील सर्व मान्यता प्राप्त शाळांनी www.prematric.mahait.org/login या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही करावयाची आहे. इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचीत जातीच्या मुलांमुलीसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गाच्या मुलां, मुलीसाठी राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना. इयत्ता १० वी मध्८ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी महर्षी विठ्ठल रामजी ६ शिंदे परीक्षा शुल्क प्रदान योजना. इयत्ता १ वी ते १० मध्ये शिकणाऱ्या साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती योजना. इयत्ता ९ वी ते १० मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना आदी योजना आहेत. तसेच महा-डिबीटी पोर्टल प्रणालीवर शाळा नोंदणी प्रक्रीयेनंतर विदयार्थ्यांचे अर्ज भरावयाची कार्यवाही शाळा मुख्याध्यापकांनी करावी. त्यामुळे विद्यार्थ्यांना मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती योजनेचा लाभ तात्काळ अदा करणे सोयीचे होईल. कार्यवाही न केल्यामुळे अनुसूचीत जातीचे विदयार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांची राहील याची नोंद घ्यावी, असे जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी देवदत्त गिरी यांनी दिली आहे.

संपादकीय

पाऊस आणि पूर

मुठा नदीत विजेची जिवंत तार गेल्याने विजेचा धक्का बसून तिघांना प्राण गमवावे लागणे हा वीज मंडळ व प्रशासन यांच्यावरील डाग आहे. किमान खबरदारीही न घेतल्याने तीन जीव हकनाक गेले आहेत.

यंदाच्या पावसाळ्यात महाराष्ट्राच्या अनेक भागांत मध्यम ते जोरदार पाऊस होत असल्याच्या बातम्या येत होत्या. त्या तुलनेत पुणे शहर व परिसरात पावसाचा फार जोर नव्हता. मात्र गेल्या सोमवार रात्रीपासून पावसाचा जोर वाढला, त्यात सातत्यही होते. गेले दोन दिवस तर संततधार सुरू होती. पुण्याला पाणी पुरवणाऱ्या धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही जोराचा पाऊस झाला. या धरण साखळीतील खडकवासला हे छोटे धरण लगेच भरले आणि त्यातून पाणी सोडण्यात आले. मुठा नदीत यंदाच्या पावसाळ्यात प्रथमच पाणी वाहू लागले. अर्थात हा घटनाक्रम आनंददायी नव्हता. गेल्या महिन्यात पहिला जोराचा पाऊस झाला तेव्हा पुण्याचे हाल झाले होते, त्याची बिघडून वाढलेली' आवृत्ती आता दिसत आहे. पुणे शहर आणि उपनगरांत अनेक ठिकाणी पाणी साचले आणि वाहतुकीची कोंडी झाली. झाडे पडण्याच्या घटना नोंदल्या गेल्या. नदी लगतच्या भागांत अनेक निवासी इमारतींच्या तळमजल्यांत पाणी घुसले व तेथील रहिवाशांना बाहेर पडणेही मुश्कील झाले. त्यांना दूध व खाद्य पदार्थ पुरवण्यासाठी आपत्ती निवारण पथकांची मदत घ्यावी लागली. सततच्या पावसाने शाळा–महाविद्यालये, औद्योगिक संस्था बंद ठेवणे भाग पडले. सर्वात वाईट म्हणजे पावसामुळे दुर्घटना घडून पुण्यात किमान चार बळी गेले.

नियोजनाचा बोजवारा

या वर्षी पावसाळ्यात किंवा मान्सूनच्या हंगामात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याचा अंदाज हवामान खात्याने मार्चमध्येच व्यक्त केला होता. महाराष्ट्र व पुण्यात पाऊस थोडा उशिरा आला, त्याचा जोरही प्रारंभी फार नव्हता. कोल्हापूर, सातारा, सांगली या भागात तसेच मराठवाड्यात जोरदार पाऊस होत असल्याच्या बातम्या येत होत्या. मुंबईत नेहेमीप्रमाणे भरपूर पाऊस होत होता. गेल्या आठवड्यापासून पुण्यात खऱ्या अर्थाने पावसाळा सुरू झाला. गुरुवारी सकाळी साडेपाच वाजता संपलेल्या चोवीस तासांत ८५.७ मिलिमीटर पावसाची नोंद शिवाजीनगरमध्ये झाली. गेल्या १२ वर्षांतील हा उच्चांक आहे. पुण्याजवळच्या लव्हासा येथे या काळात २०५.५ व लवळे येथे ११३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अशा पावसाने पुणे व परिसराची वाताहत झाली. दर वर्षीचे चित्र आहे. याचे कारण पुणे शहराचा विकास झालाच नाही, झाली ते बेसुमार वाढ. पुण्याजवळची अनेक गावे नकाशावर रेघा ओढून महापालिका हद्दीत समाविष्ट करण्यात आली. त्यांच्या मूलभूत सुविधांचा विचार तेव्हा झाला नाही. या गावांत अगदी गेल्या महिन्यापर्यंत तीव्र पाणी टंचाई होती. कारण त्यांना पाणी पुरवण्याची व्यवस्थाच झालेली नाही. त्यामुळे टँकर माफियां'नी पाण्यासारखा पैसा कमावला. जलनिस्सारण, मलनिस्सारण यांच्याही सुविधा या भागांत नाहीत. त्यामुळे थोडा जोराचा पाऊस झाला तरी तेथे पाणी तुंबते, वाहतूक विस्कळीत होते. जोरदार व संततधार पाऊस झाल्यावर तर त्या भागांच्या व तेथील रहिवाशांच्या हालास पारावार राहात नाही. निवासी भागात पूर येणे व रहिवाशांना बाहेर काढण्यासाठी आपत्ती निवारण पथकांची मदत घेण्याची वेळ या नियोजनशून्य कारभारामुळे आली आहे. पूररेषा असताना त्या मध्येही बांधकाम होत असताना प्रशासन व सरकार तिकडे दुर्लक्ष करते. मते व पैसा यांचे गणित त्या मागे असते हे सर्वांना माहीत आहे. पुण्यालगतच्या पिंपरी–चिंचवड भागातही अशीच परिस्थिती आहे. तेथेही पवना व इंद्रायणी या नद्यांचे पाणी शहरांच्या निवासी भागात घुसले आहे. मुंबईतही जोरदार पाऊस सुरू असला तरी अजूनपर्यंत पुणे–मुंबई रेल्वे सेवेवर त्याचा परिणाम झालेला नाही; पण रेल्वे सेवा बंद पडणार नाही, याची शाश्वती नाही. पावसावर माणसाचे नियंत्रण नाही, मात्र जोराचा पाऊस झाल्यास काय करावे याचे नियोजन करणे हाती आहे. पाण्याचा निचरा करण्याच्या सोयी अजूनही पुणे, मुंबई या शहरांत अपुऱ्या का आहेत याचा सरकार व प्रशासनाने विचार केला पाहिजे. पाणी साठवण्यासाठी पावसाळा सुरू होण्यापूर्वी नियोजन करणे आवश्यक आहे. अन्यथा जनतेचे हाल होत राहतील व पुन्हा पुढच्या उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण होईल.

भारतरत्न पंडित मदन मोहन मालवीय

संन्यस्त वृत्तीने आयुष्य व्यतीत करीत स्वातंत्र्यलढ्यात झोकून देऊन हिंदू धर्मासाठी आणि संस्कृतीसाठी समर्पित केलेले आयुष्य जगलेले पंडीत मदन मोहन मालवीय यांचा जन्म २५ डिसेंबर १८६१ चा. भारत सरकारने २४ डिसेंबर २०१४ रोजी पंडीत मदन मोहन मालवीय यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' देऊन त्यांना गौरविले.

प्रयाग येथे जन्म झालेल्या मदन मोहन मालवीय १८७९ मध्ये मुदूर सेंट्रल कॉलेजमधून मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचे वडील ब्रिजनाथ मालवीय हे संस्कृत शास्त्रात प्रावीण्य असलेले आणि हिंदू संस्कृतीचे ज्ञानवंत म्हणून प्रसिद्ध होते. शालेय जीवनातच मदन मोहन मालवीय 'मकरंद' या टोपण नावाने कविता लिहायचे. आर्थिक अडचणींना तोंड देत असलेल्या मालवीय यांना हॅरिसन कॉलेजच्या प्राचार्यांनी मासिक शिष्यवृत्ती दिल्यामुळे मदन मोहन मालवीय कोलकाता विद्यापीठात बी.ए. पूर्ण करू शकले. त्यांना संस्कृतमध्ये एम.ए. करण्याची इच्छा होती; पण कौटुंबिक परिस्थितीमुळे १८८४ मध्ये अलाहाबाद येथील सरकारी हायस्कूलमध्ये सहाय्यक शिक्षक म्हणून नोकरीची सुरुवात करणे भाग पडले. डिसेंबर १८८६ मध्ये मदन मोहन मालवीय यांनी दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली कोलकाता येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनात भाग घेऊन परिषदांमधील प्रतिनिधित्वाच्या मुद्द्यावर भाषण केले. त्यामुळे दादाभाई नौरोजी यांच्याबरोबरच हिंदुस्थान या हिंदी साप्ताहिकाचे संस्थापक अलाहाबाद जवळील कलाकंकर इस्टेटचे शासक राजा रामपाल सिंग हेही प्रभावित झाले.

वकिलीचा व्यवसाय

एल. एल. बीच्या शिक्षणासाठी अलाहाबादला स्थलांतर करून हे शिक्षण घेत असताना अलाहाबाद येथील 'द इंडियन ओपिनियन' या इंग्रजी दैनिकाचे सहसंपादक म्हणूनही त्यांनी काम केले. कायद्याची पदवी पूर्ण करून १८९१ मध्ये अलाहाबाद जिल्हा न्यायालयात स्वतःचा कायद्याचा व्यवसाय चालू केला. १८९३ पासून अलाहाबादच्या उच्च न्यायालयात कायद्याची प्रॅटीस करायला सुरुवात केली आणि संपूर्ण भारतात नामवंत वकील म्हणून ओळखले जाऊ लागले.१९०९ मध्ये लाहोर येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. शिक्षण आणि समाजसेवेचा संकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांनी १९११ मध्ये वकिली थांबवली. सन १९०९ मध्ये प्रयाग येथे 'स्वराज्य' नावाचे उर्दू साप्ताहिक सुरू झाले. या साप्ताहिकाच्या दहा महिन्यांच्या अस्तित्वात त्यांच्या आठ संपादकांवर राजद्रोहाचे खटले भरण्यात आले. त्याकाळात मालवीय यांनी उत्तर दिले, मी जे काही केले, ते या देशात वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी. मी जर असे केले नसते, तर उच्चार स्वातंत्र्य संपुष्टात आणण्याच्या कटात मी सहभागी झालो, असा ठपका माझ्यावर ठेवला गेला असता. या तरुणांना मदत करणे मला कसे काय नाकारता आले असते?

बनारस विद्यापीठाची स्थापना

पंडित मदन मोहन मालवीय यांनी १९१६ मध्ये भारतीयांमध्ये आधुनिक शिक्षणाला चालना देण्यासाठी बनारस हिंदू विद्यापीठाची स्थापना केली. आशिया खंडातील सर्वात मोठे निवासी विद्यापीठ आणि जगातील प्रसिद्ध विद्यापीठात याची गणना होते. विद्यापीठाची स्थापना करण्यापूर्वी मदन मोहन मालवीय यांनी हिंदू समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी १९०४ मध्ये एक व्यापक योजना तयार केली होती. त्यासाठी देशातील नेतेमंडळी व मान्यवरांची एक सभा बनारस येथे झाली. त्यामध्ये 'बनारस हिंदू विद्यापीठा'ची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले.

भारत रत्न
मदन मोहन मालवीय

बनारस हिंदू विद्यापीठाची स्थापना करण्याचा पहिला ठराव ३१ डिसेंबर १९०५ रोजी करण्यात आला. त्याचवेळी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन बनारस येथे झाले. त्यावेळी उपस्थित मान्यवरांनी बनारस हिंदू विद्यापीठाची स्थापना करण्याच्या कल्पनेला पाठिंबा दिला. देशसेवेला प्राधान्य देत असतानाच बनारस हिंदू विद्यापीठाची उभारणी करण्यासाठी त्यांनी अतोनात परिश्रम घेतले.

काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष

१९१८ मध्ये दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाचे ते दुसऱ्यांदा अध्यक्ष झाले होते. १९३२ मध्ये दिल्ली, तर १९३३ मध्ये कोलकाता येथील नियोजित काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्षपदही मालवीय यांच्याकडेच होते; पण त्या त्या वेळी अधिवेशनाच्या आधीच अटक झाल्यामुळे बंदी आणलेल्या त्या दोन्ही अधिवेशनाचे अध्यक्षपद ते प्रत्यक्षात भूषवू शकले नाहीत. १९१९ मध्ये अमृतसर येथे जालियनवाला बागेत भारत संरक्षण कायद्याचा निषेध करण्यासाठी जमलेल्या सभेवर जनरल डायरने आपल्या सैनिकांकरवी गोळीबार करून शेकडो लोकांचे बळी घेतले. या हत्याकांडानंतर त्या घटनेची चौकशी करण्यासाठी व्हाइसरॉयनी हंटर कमिशनची नियुक्ती केली. त्यानंतर लगेचच या हत्याकांडास जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना संरक्षण मिळावे म्हणून विधिमंडळात 'इंडेमनिटी बिल' सादर करण्यात आले. त्याला मालवीय यांनी विरोध करताना पाच तास भाषण करून विधिमंडळ गाजवले. दमनशाही करून हे विधेयक रेटण्यात आले; पण भारतीय विधिमंडळाच्या इतिहासातील एक उत्तम व प्रभावी असे भाषण, अशी मालवीय यांच्या भाषणाची नोंद झाली आहे.

१ ऑगस्ट १९२१ म्हणजे लोकमान्य टिळकांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या दिवशी महात्मा गांधीजींनी असहकारितेची चळवळ सुरु केली, १९२२ उजाडते तोच इंग्रज सरकारच्या धरपकड योजनेमुळे लखनौचा तुरूंग व इतर तुरूंग स्वातंत्र्यसैनिकांच्या अटकेने भरून गेले. दररोज शेकड्यांनी राजकीय कैदी आणले जात. असहकारितेची चळवळ शिगेला पोहोचली होती. १ फेब्रुवारी १९२२ रोजी महात्मा गांधीजींनी व्हाइसरॉयना पत्र लिहून मुंबई इलाख्यात बार्डोली येथे सविनय कायदेभंग सुरू करणार असल्याची नोटीस दिली. आणि अचानक ४ फेब्रुवारी १९२२ रोजी देशभक्तांच्या एका संतप्त जमावाने संयुक्त प्रांताच्या गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथील पोलीस चौकीला आग लावली. त्यात २२ पोलीस जळून ठार झाले. या घटनेने गांधीजी व्यथित झाले आणि त्यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ तहकूब केली. २२५ जणांना जाळपोळ व खून या आरोपांवरून अटक करण्यात आली. या लोकांचा बचाव करण्यासाठी एकही स्थानिक वकील पुढे आला नाही. गोरखपूरच्या सेशन्स जजने आरोपींपैकी १७७ जणांना फाशीची शिक्षा सुनावली. त्यामुळे अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपुढे हा खटला जेव्हा सुनावणीस आला, त्यावेळी २० वर्षे मालवीय यांनी वकिलीची प्रॅटीस बंद करून झाले होते. तरी या आरोपींच्या वतीने अलाहाबाद उच्च न्यायालयात बाजू मांडून १७७ पैकी १५६ लोकांची फाशी रद्द करण्यात त्यांनी यश मिळविले.

तुरुंगवासाची शिक्षा

१ ऑगस्ट १९३० रोजी लोकमान्य टिळक यांची दहावी पुण्यतिथी मुंबईत आंदोलनाने साजरी केली गेली. खूप पाऊस पडत असूनही प्रचंड मिरवणूक मदन मोहन मालवीय, वल्लभभाई पटेल, जयरामदास दौलतराम, डॉ. हर्डीकर, टी.ए. शेखानी अशा ४० जणांच्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली निघाली. पोलिसांनी धोबी तलावाजवळ मिरवणूक अडवली आणि ४० नेत्यांना अटक करीत मिरवणुकीत सामील झालेल्यांवर निर्दयीपणे लाठीमार केला. भायखळ्याच्या तुरुंगात ४० जणांना आणून २०० रुपये दंड किंवा १५ दिवसांची कैद फर्मावली. बनारस हिंदू विद्यापीठातील विद्यार्थ्यांना हे समजल्यावर १२५ विद्यार्थ्यांची एक तुकडी सत्याग्रह करण्यासाठी मुंबईला पोहोचली तोवर मालवीय यांची दंडाची रक्कम अज्ञात इसमाने भरल्यामुळे त्यांना सोडण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांची भेट तुरुंगाच्या दारातच मालवीय यांची झाली.

मदन मोहन मालवीय हे हिंदू – मुस्लिम ऐक्याप्रमाणेच अस्पृश्यता निवारण, स्त्री विमोचन अशा विविध क्षेत्रात काम करीत. महात्मा गांधी यांनी त्यांना 'महामना' ही पदवी दिली होती. महामना म्हणजे विशाल वृत्तीचे. ते स्वतः निर्भय होते. त्यामुळे इतरांना निर्भयपणा रूजविण्यास ते प्रयत्न करायचे. चित्तरंजन दास व मोतीलाल नेहरू यांच्याबरोबर १९२३ पासून स्वराज्य पक्ष स्थापून निवडणुकांत भाग घेण्याच्या प्रचारात ते सक्रिय राहिले. तथापि सर्वत्र अडवणूक हे धोरण मान्य नसल्यामुळे त्यांनी इंडिपेंडंट काँग्रेसच्या झेंड्याखाली निवडणूक लढवली. पुढे अनेक प्रश्नांवर स्वराज्य पक्षाशी सहकार्य केले; परंतु १९२६ मध्ये सभात्याग करण्यास नकार दिला. 'सायमन गो बॅक' चळवळीत ते आघाडीवर होते. १९३० च्या कायदेभंगाच्या वेळी मात्र राजीनामा देऊन त्यांनी तुरुंगवास पत्करला. पुढील वर्षी त्यांना गोलमेज परिषदेचे निमंत्रण आले, त्यावेळी महात्मा गांधी यांच्या विचारांना साथ दिली. १९३३ मध्ये कोलकाता येथे भरणाऱ्या काँग्रेस अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते; पण या अधिवेशनासाठी जात असतांना त्यांना अटक करून कैदेत टाकण्यात आले. पुढील काळात मिठाच्या सत्याग्रहात मालवीय आणि सरदार पटेल यांना अटक करून तुरूंगात टाकण्यात आले. यानंतर काँग्रेस कार्यकारिणीची बैठक डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत भरली होती. बैठक संपते न संपते तोच मालवीय यांच्यासह कार्यकारिणीतील सर्व सभासदांना अटक होऊन सहा महिन्याच्या तुरूंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. पुढे मालवीय यांना नैनितालच्या तुरुंगात नेण्यात आले. तेथे जवाहरलाल नेहरू व त्यांचे मेव्हणे रणजीत पंडितही शिक्षा भोगत होते. मालवीय तेथे जर्मन भाषा रणजीत पंडीत यांचेकडून शिकले.१९४२ च्या चले जाव' आंदोलनात मालवीय सहभागी झाले होते. यामध्ये देशभरातील विद्यार्थ्यांबरोबर बनारस हिंदू विद्यापीठातील विद्यार्थीही आघाडीवर होते. त्यावेळी ब्रिटीश सैनिकांनी बनारस हिंदू विद्यापीठात घुसून विद्यापीठाचा ताबा घेतला. त्यांनी सर्व विद्यार्थी–विद्यार्थिनींना त्यांच्या वसतिगृहातून सक्तीने बाहेर काढले. या आंदोलनात अनेक विद्यार्थी मृत्यूमुखी पडले. तर अनेकांना कारावास भोगावा लागला. यानंतर मालवीय यांनी आपली प्रकृती व वय याची पर्वा न करता ब्रिटीश सरकारला गांधीजींनी त्यांच्यावरील आरोपपत्राच्या अनुषंगाने जे स्पष्टीकरण केले, त्याला उत्तर तरी द्या, नाहीतर त्यांची ताबडतोब सुटका करा असे आवाहन केले; परंतु त्यानंतर पंडीत मदन मोहन मालवीय फार जगले नाहीत. १२ नोव्हेंबर १९४६ रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

पंडित मदन मोहन मालवीय यांचे वृत्तपत्र व्यवसायातील योगदान प्रचंड आहे. मालवीय यांनी अभ्युदय हे हिंदी साप्ताहिक १९०७ मध्ये चालू केले. त्याचे ते संपादक होते. हे साप्ताहिक १९०९ पर्यंत चालले. ब्रिटिश सरकारने १९०८ मध्ये द न्यूज पेपर कायदा आणि १९१० मध्ये इंडियन प्रेस कायदा जारी केला. याविरोधात मालवीय यांनी सुरु केली आणि अलाहाबाद येथे अखिल भारतीय वृत्तपत्रसंबंधी परिषद बोलविली. त्यानंतर ही मोहीम प्रभावी करण्यासाठी इंग्रजी वृत्तपत्राची गरज लक्षात घेऊन मोतीलाल नेहरु यांच्या मदतीने १९०९ मध्ये लीडर हे दैनिक सुरु केले. लीडर दैनिकाचे १९०९ ते १९११ ते संपादक होते. मालवीय हे १९२४ ते १९४६ या काळात हिंदुस्थान टाइम्सचे अध्यक्ष होते. त्यांच्या प्रयत्नामुळे १९३६ मध्ये हिंदुस्थान टाइम्सची हिंदी आवृत्ती सुरु झाली.

मालवीय यांनी हर की पौरी हरिद्वार येथे पवित्र गंगा नदीची आरती करण्याची परंपरा सुरु केली जी आजही केली जाते. घाटाच्या पलीकडे असलेल्या मालवीय द्वीप या छोट्या बेटाचे नाव त्यांच्या नावावरूनच देण्यात आले आहे. या बेटावर त्यांचा अर्धपुतळा उभारण्यात आला आहे. इंडियन पोस्टाने १९६१ आणि २०११ मध्ये त्यांच्या १००व्या तसेच १५०व्या जयंतीनिमित्त सन्मानार्थ तिकीट जारी केले होते. २५ डिसेंबर २००८ रोजी महामना मदन मोहन मालवीय यांचे राष्ट्रीय स्मारक मालवीय स्मृती भवन'चे उद्घाटन भारताचे तत्कालीन राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्या हस्ते दिल्ली येथे करण्यात आले. २०११ मध्ये भारत सरकारने पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या अध्यक्षतेखाली मालवीय यांची १५०वी जन्मशताब्दी साजरी केली.

शिरीष चिटणीस
प्रतिनिधी महाराष्ट्र साहित्य परिषद

तणाव आणि थकवा असू शकते काम करण्याची क्षमता कमी होण्यामागचे कारण

झोपेच्या कमतरतेमुळे आपल्या आरोग्यावर आणि कामावर परिणाम होतो. आपल्या शरीराला दररोज ७–८ तासांची झोप आवश्यक असते. या काळात तुमचा मेंदू आणि शरीराचे इतर अवयव चांगले कार्य करू शकतील. पण झोप न मिळाल्यानं आपल्या शरीरातील थकवा दूर होत नाही, ज्याचा परिणाम आपल्या कामावर होतो. चांगली झोप ऑफिसमध्ये तुमची कामाची क्षमता वाढवण्यास मदत करते. त्यामुळं दररोज पूर्ण झोप घेणं अत्यंत आवश्यक आहे.



चांगली स्मरणशक्ती : झोपेच्या कमतरतेचा तुमच्या स्मरणशक्तीवर परिणाम होतो. झोपेच्या कमतरतेमुळे कामावर लक्ष केंद्रित करणं कठीण होऊन काम करण्याची क्षमता प्रभावित होते. झोपेच्या कमतरतेमुळे निर्णय घेण्याच्या क्षमतेवरही विपरीत परिणाम होतो आणि समस्या सोडवण्याची क्षमताही कमी होते, ज्यामुळे कार्यालयातील तुमची कामगिरी नकारात्मकदृष्ट्या प्रभावित होऊ शकते. त्यामुळे चांगली झोप घेणे खूप गरजेचं आहे.

कमी आजारी पडता : झोपेच्या कमतरता अनेक आजारांना निमंत्रण देते. त्यामुळे तुमच्या काम करण्याच्या क्षमतेवरही परिणाम होतो. खराब आरोग्यामुळं तुमच्या कामाची कार्यक्षमता कमी होते आणि तुम्ही चांगल्या पद्धतीनं काम करू शकत नाही. झोपेच्या कमतरतेमुळे, रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका देखील असतो, ज्यामुळे तुमच्या आयुष्यावर वाईट परिणाम होतो.

मूड चांगला राहतो : झोपेच्या कमतरतेमुळं तुमची चिडचिड होऊ शकते, ज्यामुळं ऑफिसमधील लोकांसोबत तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळं पुरेशी झोप आणि चांगली झोप या दोन्ही गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. पुरेशी झोप घेतल्यानं तुमचा मूड सुधारतो आणि तणावही कमी होतो. या कारणामुळं तुम्ही कामावर अधिक चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रित करू शकता.

उत्पादकता वाढते : तुम्ही निर्धारित वेळेत किती काम करू शकता याला तुमची उत्पादकता म्हणतात. झोपेच्या कमतरतेमुळं, तुमचं लक्ष कमी होते, जे उत्पादकता कमी होण्याचं सर्वात मोठे कारण आहे. त्यामुळे पूर्ण झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे. याव्यतिरिक्तं चांगली झोप घेतल्यानं तुमची सर्जनशीलता देखील वाढते, जे तुम्हाला तुमचं काम मजेदार आणि चांगल्या पद्धतीनं करू देते.

राशी भविष्य

२७ जुलै २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पूर्व
अपूर्ण राहिलेले काम वेळेवर पूर्ण होतील. कौटुंबिक प्रगती होईल. थोडे प्रयत्न केल्याने फायद्याचे मार्ग मोकले होतील. वरिष्ट लोकामध्ये प्रतिष्ठा वाढेल. जोखमीचे कामात सावधानी बाळगा.

वृषभ : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम
प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राही. काही नवीन योजना आखताल. दुसऱ्याची निदा करणे सोडून द्यावे.

मिथुन : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
व्यवहारात स्पष्टपणा दाखवा. प्रवास शक्यतो आज टाळा. मानसिक त्रास राहणार आहे.कामकाजात मन लागणार नाही. कौटुंबिक समस्येमुळे चिंतेत रहाल.

कर्क : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम
कामकाजात सावधानी बाळगा. वातावरण अनकूल जरी असले तरी आपले काम पूर्ण हेणार नाही. व्यापारात अडचणी येतील. स्थावर मालमत्ता खरेदी करण्याकरिता गडबड करू नका.

सिंह : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
वेळेत काम पूर्ण न झाल्यामुळे निराश रहाल. नौकरीमध्ये आपल्या कामाचे कौतुक होईल. कुटुंबातील समस्येकडे डोळेझाक करू नका. आर्थिक योग मध्यम राहील.

कन्या : शुभ रंग:केसरी,शुभ दिशा:पूर्व
सामाजिक कार्यात सक्रीय रहाल. आशा आकांक्षा पूर्ण होतील. आपल्या प्रयत्नांनी घरगुती समस्या दूर होतील. रागावर नियंत्रण ठेवा.

तुळ: शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व
प्रयत्न केले तर अवघड कामातही यश मिळेल. लांबच्या मित्राची गाठ होईल. अचानक झालेल्या लाभामुळे आनंदी रहाल. वेळेचा सदउपयोग करा. व्यापार चांगला चालेल.

वृश्चिक: शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण
नौकरीत अधिकारी वर्गाकडून सहकार्य लाभेल. काही नवीन योजना आखाल. कौटुंबिक सहकार्याने दिवस उत्साहीत जाईल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

धनु: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम
विचार पूर्वक कामे केले तर फायदा होऊन आपली प्रशंसा होईल. व्यापारात प्रतिस्पर्ध्यावर मात कराल. जीवनसाथीशी वाद होण्याची शक्यता आहे.

मकर :शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व
व्यापार, व्यवसायात जबाबदारीने व्यवहार करा. वडिलधाऱ्या लोकांशी वाद होण्याची शक्यता आहे. प्रवासात सावधानी आवश्यक आहे.

कुंभ: शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
श्रमाच्या कामात यश मिळेल. नवीन संबंध भविष्यात फायदेशीर असतील. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. मुलांच्या कामकाजावर लक्ष द्या.

मीन : शुभ रंग :केसरी, शुभ दिशा: पश्चिम
कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. बुद्धी चातुर्यामुळे आर्थिक स्थितीत वृद्धी होईल. यश, मान, प्रतिष्ठा मिळेल. घरगुती समस्यांकडे दुर्लक्ष करू नका.

२७ जुलैला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, नेपच्यून, मंगळ व सूर्याचा प्रभाव आहे. तुमची भावनिक आंदोलने जास्त प्रमाणात होतात. राग तुम्हाला लवकर येतो व जातोही लवकर. निर्णय घेतांना साधकबाधक विचार करण्यापेक्षा तुम्ही तो भावनेच्या भरात घेऊन मोकळे होता. तुमची वृत्ती आक्रमक असते. पण आपल्या कृतीमुळे इतरांना दु:ख होऊ नये अशीही तुमची इच्छा असते. तुमचा आत्मविश्वास प्रचंड असतो. कोणतीही अडचण आली तरी तुमचे मनोबल कमी होत नाही. सत्ता अधिकाराची तुम्हाला आकांक्षा असते. फाजील आत्मविश्वासाच्या आहारी जाऊन न पेलणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. सगळी कामे स्वत:च्या हिमतीवर रेटण्यापेक्षा अधूनमधून इतरांचे सहकार्य घ्या. संतापावर नियंत्रण ठेवायला शिका नाहीतर डोकेदुखी, उच्च रक्तदाब, अल्सर या विकारांचे शिकार व्हाल.

कार्यक्षेत्र : पोलिसदल, संरक्षण दल, अग्निशमन दल वगैरे क्षेत्रे तुमच्या साहसी प्रवृत्तीला अनुकूल ठरतील. त्यापैकी तुम्ही पाण्याशी संबंधित असल्याने नाविक दलात उत्कर्षाची शक्यता अधिक आहे. तांत्रिक नैपुण्याच्या जोरावर वीज, यंत्ररचना, इंधने, ऑटोमोबाईल, रसायन वगैरे शाखात अभियांत्रिकीची पदवी संपादन करता येईल. वैद्यकीय क्षेत्रात त्वचारोगतज्ज्ञ प्लॅस्टिक सर्जन, हृदयविकारतज्ज्ञ म्हणून कामगिरी बजावाल.

प्रणयी जीवन : तुमच्या उतावळ्या स्वभावाने आपण गुंतलेल्या व्यक्ती जवळ प्रेमभावना व्यक्त करून तुम्ही मोकळे होता. त्या आधी त्या व्यक्तीची भूमिका जाणून घ्या. नाहीतर प्रेमभंगाचे दु:ख पदरी पडेल. तुमच्या साहसी वृत्तीवर प्रेम करणारा, उत्तेजन देणारा जोडीदार तुम्हाला हवा असतो. अशी व्यक्ती सप्टेंबर २३ ते ऑक्टोबर २२ मधील व्यक्तीत सापडेल.

वर्षफळ : कार्यालयात आतापर्यंत केलेल्या परिश्रमांना पसंतीची पावती मिळेल. सहकारी मार्गदर्शनासाठी जवळीक साधतील. जुलै ऑगस्ट मध्ये दूरसंचार क्षेत्रातील उत्पादनांच्या एजन्सी मिळतीत. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये गुप्त शत्रूंच्या कारवाया चालू रहातील. डिसेंबर जानेवारी मध्ये महत्वाच्या पदावर विराजमान होऊ शकाल. मार्च एप्रिल मध्ये मुलांच्या चमकदार यशाने समाधान वाटेल. मे जून मध्ये कुटुंबियांसमवेत रमणीय स्थळी प्रवास होतील.

महत्वाचे वर्ष : ९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७२.

भाग्यरत्न : पोवळे याच तारेखेची व्यक्ती : मधू कांबीकर, ऍलन बॉर्डर, जाँटी ऱ्होड्स

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय–गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी–२४६९४६, मुख्य कार्यालय –५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी–२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी–(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय–(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक–**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे भुयारी गटारी कामाचा दर्जा चांगला नसल्याबाबत महापालिका आयुक्ताना निवेदन

लातूर / प्रतिनिधी- लातूर शहरात सध्या अनेक ठिकाणी भुयारी गटारीचे काम सुरु आहेत तर काही ठिकाणी कामे पूर्णत्वास गेली आहेत सदरील कामी वापरण्यात येणाऱ्या घाण पाणी वाहून नेणाऱ्या पाईपची साईज लहान आकाराच्या आहेत भविष्यात या पाईप लहान पडून पाण्याच्या व कचऱ्याच्या ओघाने ब्लॉक होण्याची शक्यता वाटते त्यामुळे या पाईपची प्रत्यक्ष पाहणी करून आयुक्तांनी तो तात्काळ बदलावा, भुयारी गटार कामासाठी नव्याने बनवलेले रस्तेही खोदण्यात येत आहेत सदर रस्ते जेसीबी मशीनने खोदण्यात येत असल्याने पूर्ण रस्ता खराब होत आहे.

त्यामुळे नवीन सिमेंट रस्ता कटरच्या सहाय्याने तोडून पुन्हा पॅच करावा भुयारी गटारी कामाचा दर्जा सुद्धा चांगला नसल्याने या निकृष्ट कामाची दखल महापालिका आयुक्तांनी तात्काळ घ्यावी, असे लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवार दि. २५ जुलै रोजी मनपा आयुक्तांना निवेदन देण्यात आले आहे.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, गणेश देशमुख, प्रा. प्रवीण कांबळे, प्रवीण सूर्यवंशी, ॲड. देविदास बोरूळे पाटील, जालिंदर बर्डे, धनंजय शेळके, अक्षय मुरुळे, विजय टाकेकर, रत्नदीप अजनिकर, विजय टाकेकर, खाजामिया शेख, गिरीश ब्याळे, अँड. सुनीत खंडागळे, विजय गायकवाड, कुणाल वागज, अभिषेक पतंगे, पिराजी साठे, शेख कलीम, आकाश मगर, राजू गवळी आदी उपस्थित होते.

शरीर डिटॉक्स करण्यासाठी या पदार्थांचा रोजच्या आहारात समावेश करा

काही वेळा अयोग्य खाण्याच्या सवयींमुळेही तब्येत चांगली नसते. कारण शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठी फक्त योग्य आहाराची व जीवनशैलीची गरज नाही. तर वेळेवर शरीर शरीर शुद्धीकरण (डिटॉक्स) करणे देखील फार आवश्यक आहे.

शरीर डिटॉक्स केल्याने विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि शरीरही दीर्घकाळ निरोगी राहते. अनेक वेळा चुकीचा आहार आणि अनियमित जीवनशैलीमुळे शरीरात अनेक प्रकारच्या समस्या सुरू होतात त्या शरीरात साचून राहिलेल्या विषारी द्रव्यांमुळेच. त्यामुळे आजार होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. अशा वेळी शरीराला डिटॉक्स करणे आवश्यक होते. शरीर डिटॉक्स करण्यासाठी काही पदार्थ वापरू शकता. हे पदार्थ खाल्ल्याने शरीर निरोगी होते आणि विषारी पदार्थही सहज निघून जातात. चला जाणून घेऊया अशा पदार्थांविषयी जे शरीर डिटॉक्स करतात.

लिंबू : लिंबूमध्ये सोडियम, पोटॅशियम, लोह आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. लिंबाचा रस शरीराच्या अनेक समस्या सहज दूर करतो. लिंबाचा रस शरीर डिटॉक्स करण्यासाठी वापरला जाऊ शकतो. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासोबतच लिंबाचा रस शरीरातील विषारी पदार्थही सहज काढून टाकतो. शरीर डिटॉक्स करण्यासाठी दररोज सकाळी लिंबूपाणी प्या.

आले : आले शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. यामध्ये सोडियम, पोटॅशियम, प्रोटीन आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. याच्या वापराने शरीर डिटॉक्स होण्यास मदत होते. यामुळे पोटाच्या अनेक समस्या सहज दूर होतात. ते वापरण्यासाठी, आले चहामध्ये टाकून प्यावे.

फुलकोबी : कोबी शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. याच्या वापराने शरीर डिटॉक्स होण्यास मदत होते. कोबीमध्ये भरपूर फायबर असते, जे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. कोबीमुळे पोटही निरोगी राहते. हे भाजी किंवा कोशिंबीर द्वारे वापरले जाऊ शकते.

नारळ पाणी : नारळाच्या पाण्याच्या सेवनानेही शरीर डिटॉक्स करता येते.

हायड्रोजनयुक्त पाणी : हाइड्रोजन हा अतिसूक्ष्म व अतिशक्तिशाली अँटिऑक्सिडंट आहे. हायड्रोजनयुक्त पाणी नियमितपणे पित राहिल्यास शरीर डिटॉक्स होत राहते

नियमीत तुलसी ड्रॉप व डायजेस्ट यामुळे सुचना -वात,पित्त,कफ कमी होते व शरीर रोज डिटॉक्स होते.

मानवतेचा मानस...!

मी नवी मुंबईहून नाशिकच्या मार्गाला लागलो. रस्त्यामध्ये काही पाड्यांना भेटी देत सायंकाळपर्यंत नाशिकला जावं, हा बेत करून मी जात होतो. शहापूरजवळच्या एका पाड्यावर थांबलो. तिथल्या काही शेतकरी बांधवांशी बोलत होतो. निवडणुका, सरकार, स्थानिक पातळीवरील राजकारण आणि त्यात भरडली जाणारी ही सगळी पाड्यावरची माणसं आहेत, हे मी अनुभवत होतो. त्या पाड्यावर मी काही शेतकऱ्यांशी बोलत असताना एक छोटासा टेम्पो त्या गावात आला. टेम्पोला पाहून सगळे लोक हातामध्ये तांब्या, बाटली, ग्लास घेऊन टेम्पोच्या दिशेने जात होते. मी माझ्या बाजूला उभ्या असलेल्या शेतकऱ्याला म्हणालो, ऋऋही मंडळी अशी पळतात का?'' ते म्हणाले, ऋऋकाही नाही, दूध आलेय. ते दूध आणण्यासाठी जात आहेत.'' मला वाटले, की दूध विक्रीसाठी कोणीतरी घेऊन आले असेल, पण तसे नव्हते. ते दूध तिथे मोफत वाटले जात होते. मी माझ्या बाजूला असलेल्या माणसाला परत म्हणालो, की ही माणसे फुकट दूध देतात का, पैसे घेत नाहीत? तो म्हणाला, 'मानस' नावाचा शेतीचा फार्म आहे. त्या ठिकाणी असणाऱ्या गाईचे दूध रोज काढून आसपासच्या आदिवासी पाड्यांवर, गावांमध्ये वाटले जाते. मला त्या व्यक्तीचे ऐकून आश्चर्य वाटले. मी त्या टेम्पोवाल्याला म्हणालो, ऋऋतुम्ही हे दूध रोज वाटप करता का?'' ते म्हणाले, ऋऋनाही, दोन ते तीन दिवसांत आम्ही दूध एकत्रित जमा करून वाटप करत असतो.'' तुमचा फार्म कुठे आहे ? मी पुन्हा त्याला विचारले, तो म्हणाला, ऋऋ१५ किलोमीटर अंतरावर आहे.'' मी त्या फार्मचा पत्ता घेतला आणि तिथे लोकांशी बोलून त्या फार्मच्या दिशेने निघालो. शहापूरवरून पुढे जाताना साजिवली येथे भातसा धरणाच्या अगदी जवळ असलेले हे ऋमानस कृषी शेती' असा मोठा बोर्ड लावलेला आहे. मी ओळख सांगून आतमध्ये प्रवेश केला. एका झोपडीमध्ये एक व्यक्ती आदिवासी महिलांना धान्य वाटप करताना मी पाहिले. मी तिथं गेलो आणि मागे चुपचापपणे उभा राहिलो. सर्व महिलांना धान्य दिल्यावर ती व्यक्ती म्हणाली, '' ज्या गरजू आणि कुपोषित बालकांच्या आई आहेत त्यांच्यासाठी आम्ही हे धान्य देण्याचे काम करत असतो. आपल्या अवतीभवती असलेल्या अनेक गरजवंत महिला यांना या संदर्भात सांगा.'' त्या महिलांनी डोक्यावर बॅगा उचलल्या आणि त्या आपल्या घराच्या दिशेने निघाल्या. त्यातल्या मी दोन महिलांशी बोलत होतो, त्यामध्ये गीता नावाची महिला मला म्हणाली, ऋ या जमान्यात कोण कोणाला मदत करते बाबा, ही माणसे पुढाकार घेऊन काहीतरी चांगले काम करतात,' दुसऱ्या जमुनाबाई म्हणाल्या, ऋगेल्या अनेक वर्षांपासून ही माणसे धान्य वाटप करण्याचे काम करतात. याच शेतामध्ये पिकलेले, इथेच देण्याचे काम त्यांनी हाती घेतले. प्रत्येक वेळेला धान्य देण्यासाठी येणाऱ्या महिला वेगवेगळ्या असतात. वेगवेगळ्या भागातल्या असतात. काळ नेहमी आम्हा गरिबाची परीक्षा घेतो. कधी आजारपण लहान मुलाभोवती असते, कधी म्हाताऱ्या माणसाचा जीव जातो. अशा स्थितीत ही माणसे देव म्हणून आमच्या आसपास असणाऱ्या सर्व पाड्यांवर जातात. सर्वांना भेटून मदत करतात. मी कुपोषणामुळे चार मुलांना मुकले. आता आई-बाबा आणि अपंग असलेल्या पतीला मी सांभाळते.' जी व्यक्ती धान्य वाटप करत होती त्या व्यक्तीजवळ जाऊन मी त्यांना नमस्कार केला. त्यांच्याशी बोललो. त्यांच्याकडून तिथे चालणाऱ्या सगळ्या उपक्रमाविषयी माहिती घेतली. मी ज्यांच्याशी बोलत होतो त्यांचे नाव व्यंकटेश जोशी (९४२३१३६६०४), ते 'मानस'चे संचालक होते. मूळचे नांदेड जिल्ह्यातील धर्माबादचे असणारे जोशी यांनी त्यांच्या अनेक सहकारी मित्रांच्या मदतीने २५० एकर शेतीत सजीव शेतीचे प्रयोग करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यात स्वतःला वाहून घेतले. जगात शेतीबाबत होणारे सर्व प्रयोग येथे होतात. देशभरातून शेतकरी येथे प्रशिक्षण घेण्यासाठी येतात. गुजरात येथून गिरनार महाराज यांच्याकडून आणलेल्या पाचशे गीर गाई आहेत. या गाईचे दूध विक्रीसाठी नाही तर आसपासच्या गावांतल्या गरीब, कष्टकरी यांना वाटण्यासाठी आहे. गोमूत्रापासून पिकासंदर्भात असणारी सर्व औषधे येथे तयार केली जातात. विहिरीत गोमूत्र सोडले जाते आणि ते पुन्हा झाडांना दिले जाते. शंभर एकर शेती येथे पडीक आहे, त्याचे कारण ती जमीन गाईंना चरण्यासाठी ठेवली आहे. गाय, अग्निहोत्र, जैविक खत ही ओळख या प्रकल्पाची आहे. जोशी माझ्याशी बोलत होते आणि मी त्यांचे सारे ऐकत होतो. सारा प्रकल्प जोशी यांनी मला फिरून दाखवला. एका व्यक्तीची ओळख करून देताना जोशी मला म्हणाले, हे व्यंकटेश कुलकर्णी, माझे मावस भाऊ आणि गुरुसुद्धा आहेत. या प्रोजेक्टचे चेअरमन आहेत. त्यांनीच मला मुंबई दाखवली. मी कुलकर्णी सर यांना नमस्कार केला. एखाद्या साधूच्या चेहऱ्यावर जसे तेज असते तसे तेज कुलकर्णी यांच्या चेहऱ्यावर होते. जोशीकाका काही माणसांशी बोलत होते, त्या वेळी मी कुलकर्णी यांच्याशी वेगवेगळ्या प्रयोगांविषयी बोलत होतो. कुलकर्णी म्हणाले, शेतीसाठी देशी गाय खूप महत्त्वाची आहे. त्यासाठी जिथे शेती आहे तिथे गाय महत्त्वाची आहे. त्याशिवाय शेतीसाठी प्रसन्न वातावरणही महत्त्वाचे आहे, त्यासाठी अग्निहोत्र आवश्यक आहे. अनादी काळापासून शेतीतून निघणाऱ्या धान्यातून आमच्या पिढ्या धष्टपुष्ट तयार झाल्या. कित्येक माणसे १३० वर्षांपर्यंत जगायची, पण आता सारेकाही सत्त्वहीन, रासायनिक खताचं खाऊन पन्नाशीत माणसांना जगणं नकोसे झाले आहे. कुलकर्णी यांचे शेतीबाबत सारे प्रयोग जबरदस्त होते. तिथला सोनचाफा तर आयुष्यभर आठवणीत राहील असाच होता. जोशी पुन्हा आले आणि माझ्याशी बोलत होते. ते म्हणाले, ऋऋमाझे वडील नारायण जोशी स्वातंत्र्यसैनिक होते. ते प्रचंड धार्मिक होते. हातात येईल तेवढा तांदूळ ते घ्यायचे, तेवढाच शिजवून खायचे. माझे आजोबा गोविंद आबा भट गावाकडे ज्योतिषी होते, कुणाची गाय चोरीला गेली, घरातून माणूस निघून गेला, तो कुठे गेला, ते बरोबर सांगायचे. त्यांची कार्यपद्धती मी अवगत केली, असे मला जोशीकाका सांगत होते. मी जोशीकाका यांच्या गाडीत बसलो. त्यांनी प्रोजेक्टवर जितके प्रशिक्षण सुरू होते तिथे आम्ही जाऊन आलो. द्राक्षे, डाळिंब, चिकू, भातशेती, भेंडी अशा सर्व पिकांबाबत प्रशिक्षण सुरू होते. दरवर्षी किमान सात ते आठ हजार शेतकरी येथून प्रशिक्षण घेऊन विषमुक्तीसाठी पुढाकार घेतात. जोशी, कुलकर्णी आणि अन्य मित्रांच्या सहकार्याच्या मदतीने सुरू झालेल्या या प्रयोगाच्या माध्यमातून येत्या दहा वर्षांत राज्यातले किमान अर्धे शेतकरी तरी विषमुक्त शेतीकडे वळवण्याचा 'मानस' या बंधूने आखला आहे.ऋऋ जोशी आणि कुलकर्णी बंधूंचा निरोप घेऊन मी परतीच्या वाटेने निघालो. जोशी काकांनी मला सोनचाफ्याची फुले बांधून देताना ते मला म्हणाले, तुम्हाला सोनचाफ्यांची फुले फार आवडतात. मला एकदम धक्का बसला, मी म्हणालो, तुम्हाला कसे काय माहिती. त्यावर जोशीकाका हसून म्हणाले, मी ज्योतिषी आहे, काकांच्या बोलण्यावर मीही हसलो. त्या सोनचाफ्याचा सुगंध पुढचे चार दिवस माझ्या गाडीत आणि घरात दरवळत होता. त्यापेक्षाही जोशी, कुलकर्णी यांनी निःस्वार्थीपणे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना गायींच्या संवर्धनातून दिलेला विषमुक्त शेतीचा प्रयोग फार महत्त्वाचा होता. ऋजय किसान'चा नारा या बंधूंच्या समर्पक भावनेतून निनादणारा होता, बरोबर ना...!

*****

- संदीप काळे.

-सौजन्यः अशोक शिवपुजे, पुणे

विद्यार्थी, पालक, शिक्षक, अधिकारी यांच्यासाठी जागरण मार्गदर्शक आहे!

मराठी साहित्यविश्वात कथासंग्रह, कवितासंग्रह , व्यक्तीचरित्र, वात्रटिकासंग्रह , बालसाहित्य व इतर साहित्य प्रकारातदेखील चार दशकापासुन सुमारे पाच डझनहुन अधिक साहित्यकृतीची भर टाकणारे जेष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांचे नुकतेच प्रकाशित झालेले जागरण हे आत्मचरित्र माझ्या वाचण्यात आले.

मराठवाडा भुषण कवी भारत सातपुते व माझी मैत्री दोन तपाहून अधिक जुनी आहे. आम्ही दोघांनी सहा वर्षे एकत्र काम केलं. लातूरमध्ये गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी , शिक्षणाधिकारी या पदावर काम करताना भारतरावचे शैक्षणिक प्रशासनातील काम जवळुन पाहाता आले. विशेषता लातूर जिल्हा परिरषेत शिक्षण विभागात सर्व शिक्षा अभियानामध्ये पर्यायी शिक्षण समन्वयक म्हणून ते कार्यरत होते. लातूर जिल्ह्याचा वार्षिक कृती आराखडा व नियोजन करताना तसेच प्रभावी अंमलबजावणी करतांना भारतराव यांची प्रशासनास मोलाची साथ मिळाली. त्यांच्या योगदानाचे लातूर जिल्हा अनेक वर्षे राज्यात पहिला असायचा. लातूर जिल्ह्यातील लातूर व औसा येथील बंद पडायच्या मार्गावर असलेल्या मुलामुलींच्या प्रशालांचे स्थलांतर अनुक्रमे भातखेडा, शासकीय वसाहत , जावळी व भादा करतांना भारतरावची मोठी मदत झाली. शैक्षणिक प्रवाहात झोकून देऊन काम करताना त्यांनी साहित्य सेवा सुद्धा चांगली केली. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केले. त्यांच्या ब-याच पुस्तकाचे प्रकाशन लोकनेते विलासरावजी देशमुख साहेब यांच्या हस्तेच झाले.

आई - वडिलाच्या संस्कारात वाढलेल्या भारतराव यांनी बालपणी भोगलेल्या यातना प्रसंगाचे निर्मळ व स्पष्टपणे लेखन केलं आहे. त्यांच्या परिवाराचा पोट व पाटी पेन्सिलचा संघर्ष खूप मोठा आहे. त्यांच्या जीवनातील काही प्रसंग वाचताना मन हेलावून जाते. शिक्षण घेऊन नोकरी मिळाल्यानंतरही भारतरावचा संघर्ष थांबला नाही. कुटुंबात वयोवृद्ध पिता व स्व आई , लहान धाकटी भावंडे व पत्नी मुल मुली यांच्यासाठी घरात जेष्ठ असुनही सक्षम पालकत्वाची भुमिका निभावू शकलो नाही, असे नमूद करतांना भारतराव स्वतःला दोषी समजतात ,पण ते तसं नाही या संघर्षाच्या बिकट वाटेवर त्यांचे भाऊ, मुलं उच्च विद्या विभुषीत झाली. मोठ्या हुद्यावर पोहचली याबद्दल सातपुते वहिनी व भारतरावचा निश्चित अभिमान वाटतो.

भातांगळी, हरंगुळ खु , भातखेडा, निलंगा व भादा येथे शिक्षक, पदवीधर व माध्यमिक शिक्षक म्हणुन विद्यार्थी प्रिय राहिले. प्रत्येक ठिकाणी निर्भिड काम करताना काहीं नाठाळ गावकरी, कामचुकार सहकारी व शिक्षण व्यवस्थेतील व्याभिचारी व भ्रष्ट अधिकारी यांच्या समवेत सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांनी संघर्ष केला. स्वतः कधी चुक होऊ दिली नाही व इतरांच्या चुकीला त्यांनी माफी कधी दिली नाही. अन्याय झाला की भारतराव तेथे उभे राहत. न्याय मिळत नाही तोपर्यंत ते शांत बसत नव्हते.

गुणवत्ता संवर्धनासाठी अहोरात्र झटणाऱ्या भारतरावच्या आयुष्य आलेल्या सर्वात कटू प्रसंगाचा मी साक्षीदार आहे. प्रतिनियुक्तीवर जिल्हा कार्यालयात असतांनाच एकदा दुसऱ्या शनिवारी कार्यालयास सुट्टी होती. त्या दिवशी त्यांनी आपल्या मुळ शाळेस भेट दिली. मैत्री असलेल्या एका सहकारी शिक्षिकेशी किरकोळ कारणाने मतभेद झाले .त्याचे रूपांतर वादात झाले. ही बातमी शाळेतील मुलामुलीं मार्फत गावात गेली. काही नाठाळांनी त्याचं भांडवल करुन मिडियाला कळविलं . या प्रसंगाला तेलमिठ लावून त्याला मोठं केलं. त्यांची तक्रार फोनवर वरिष्ठ कार्यालयाकडे झाली . तातडीने सुत्रे हालली. आज आता ताबडतोब या पद्धतीच्या प्रशासनाने तातडीने चौकशी करण्याचे तोंडी आदेश दिले . वरिष्ठ अधिका-यांच्या समवेत मला त्या चौकशीस तात्काळ जावे लागले. दोन तीन तास चौकशी झाली. या चौकशीत दोघांनाही दोषी धरून प्रशासनाचे हीत पाहणा-या भारतरावला प्रशासनाने ना साथ दिली, ना अभय दिलं. तक्रार कर्त्याबरोबरच भारतरावलाही निलंबित केलं. वरिष्ठांमुळे मला त्याक्षणी काहीही मदत करता आली नाही. सतत न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या भारतराववर या प्रसंगात अन्याय झाला होता. मुख्यमंत्री महोदया बरोबर असलेली भारतरावची मैत्री व निर्दोषीपणा यामुळे त्यांचे निलंबन एकदोन दिवसात रद्द झालं. या प्रसंगाचे जागरण मध्ये वर्णन करताना भारतराव स्वतःची झालेली चूक स्पष्ट नोंदवितात. आजपर्यंत अनेक आत्मकथनं वाचली पण स्वतःला उसवुन घेऊन आयुष्यातील संचित सुख कमी पण दु.ख जास्त वाचकापुढं उघड करून सांगणारं इतकं स्पष्ट आत्मकथन मी सुद्धा पहिल्यांदा वाचलं. उत्तम साहित्यकृती लेखनाबद्दल भारतराव यांचं कौतुकच. शिक्षक, पदवीधर शिक्षक, प्रतिनियुक्तीवर असतांना तसेच निलंगा प्रशाला व भादा प्रशाला येथे माध्यमिक शिक्षक ते प्रभारी मुख्याध्यापक पदावर काम करताना शैक्षणिक प्रशासनात बेशिस्त वागणा-या ,कामचुकवेगिरी व भ्रष्टाचार करणाऱ्यांना त्यांनी चांगलंच वठणीवर आणल्याचे प्रसंग नमुद केले आहेत. भारतरावचा चुकीच्या परीक्षा पद्धती व भादा येथील सुट्टी विना शाळा या उपक्रमातील भारतरावचे संघर्ष प्रसंग जगावेगळे आहेत. या प्रसंगीचे वर्णन करताना त्यांना लाभलेल्या चांगल्या मित्र मंडळी बद्दल सुद्धा भरभरून लिहिलेलं आहे. काही कटू प्रसंगात सहकारी कर्मचा-यांशी जास्त संघर्ष करावा लागला. उत्तम प्रशासकास कार्यापासून दूर ठेवण्यासाठी किंवा नेस्तनाबूत करण्यासाठी बाई ,बाटली व पैसा या शस्त्राचा वापरला केला जातो. स्वकियांनी या शस्त्राचा वापर करून भारतरावला उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. महिलांच्या तक्रारीत त्यांना उच्च न्यायालयापर्यंत झगडावं लागलं. सत्य मेव जयते म्हणतात तसं त्यांची निर्दोष मुक्तता झाली. शेवटी सोनं ते सोनं असतं. म्हणून सोन्यालाच शुद्धतेच्या कसोटीला वारंवार सामोरे जावे लागते लोखंडाला नाही.

आपल्या ध्येयापासून दूर जाईल तो भारत कसा? ज्याचं नाव भारत तो नोकरीच्या आरंभापासून ते सेवानिवृत्तीपर्यंत व आजही संघर्ष योद्धाच आहे. स्वकियांशी केलेल्या संघर्षात भारतराव स्वतःला बदनाम झाल्याचे एका प्रसंगात लिहितात. प्रत्यक्षात तसं नाही. भारतरावनी शैक्षणिक प्रशासनात विविध उपक्रमांची कल्पक मांडणी करून सुधारणा केल्या स्वतः निर्मळ व निर्व्यसनी राहून व्यसनमुक्ती, कॉपीमुक्ती, प्रौढ शिक्षण, पर्यावरण जनजागृती, वृक्षारोपण वृक्षसंवर्धन , योगा शिक्षण , गुणवत्ता विकास , वस्तीशाळा , शाळाबाहय बालकांचे शिक्षण आदि क्षेत्रात चौकटी बाहेर जाऊन तळागाळात केलेलं समाज जागृतीचे कार्य विद्यार्थी, पालक व प्रशासन कधी विसरू शकणार नाही. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रातील त्यांच्या अनेक उपक्रमांची मिडियाने व प्रशासनाने दखल घेतली. त्याबद्दल त्यांना शासनाने राज्य शिक्षक पुरस्कार देऊन गौरविले .

आपले कर्तव्य सांभाळुन भारतरावने हजारो किलोमीटरच्या प्रवास करून साहित्यातून समाज जागृतीचे मोठं काम झालं आहे . त्याबददल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले . त्यांचा यथायोगय सन्मान झाला. आणि सेवानिवृतीनंतर भारतरावने शब्दबद्ध केलेल्या आपल्या आत्मकथनास जागरण हे योग्य शिर्षक दिलं. ते अत्यंत समर्पक आहे. हे जागरण वाचकांची केवळ करमणूक करत नाही तर शिक्षण क्षेत्रात कार्ये करणाऱ्या पुढच्या पिढीला जागरण नावाचा शैक्षणिक ग्रंथ त्यांनी दिला आहे . जागरण म्हणजे शैक्षणिक समस्या समजावून घेऊन वेगवेगळ्या उपक्रमाच्या मदतीने समस्या सोडविण्यासाठी ते मार्गदर्शक आहे. विना पैशाच्या उपक्रमांची ही जंत्री आहे.

विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासनातील अधिकारी यांच्यासाठी अत्यंत मार्गदर्शक आहे.

- पोपट काळे

(माजी शिक्षणाधिकारी ,पुणे)

डेंग्यू ताप पसरत आहे

गुडघ्यापासून पायाच्या बोटांपर्यंत खोबरेल तेल लावा. हे सकाळपासून रात्रीपर्यंत प्रतिजैविकांच्या थराप्रमाणे काम करते. डेंग्यूचा डास गुडघ्यापेक्षा उंच उडू शकत नाही.जर एखाद्याला डेंग्यूचा त्रास होत असेल तर हिरवी वेलची बियाणे तोंडाच्या दोन्ही बाजूला ठेवा, चघळणार नाही याची काळजी घ्या. रिकाम्या तोंडात ठेवल्याने रक्तपेशी सामान्य होतात आणि प्लेटलेट्स लगेच वाढतात. हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवावा ही नम्र विनंती. ४८ तासांत डेंग्यूचा नायनाट होऊ शकतो सक्षम औषध कृपया हा संदेश पाठवा महत्वाची माहिती जास्तीतजास्त लोकांना पाठवा:-

डेंग्यू किंवा सामान्य तापामुळे जर एखाद्याला प्लेटलेट्स कमी होत असतील तर होमिओपॅथी औषध आहे. Eupatorium Parfueum २०० लिक्विड डायल्युशन होमिओपॅथिक औषध.

साध्या पाण्यात दर २-२ तासांनी ३ किंवा ४ थेंब टाका आणि फक्त २ दिवस प्या.

सौजन्यः शिला राजेंद्र लटंगे.

डिकसळ

१८ वाक्यों में गीता के १८ अध्यायों का संक्षेप में सार

एक पंक्ति वाली गीता -
गीता का एक वाक्य-
अध्याय १ -
गलत सोच ही जीवन की एकमात्र समस्या है।
अध्याय २ -
सही ज्ञान ही हमारी सभी समस्याओं का अंतिम समाधान है।
अध्याय ३ -
निस्वार्थता ही प्रगति और समृद्धि का एकमात्र तरीका है।
अध्याय ४ -
हर कार्य प्रार्थना का कार्य हो सकता है।
अध्याय ५ -
व्यक्तित्व के अहंकार को त्यागें और अनंत के आनंद का आनंद लें्।
अध्याय ६ -
प्रतिदिन उच्च चेतना से जुडें्।
अध्याय ७ -
जो सीखें, उसे जिएँ्।
अध्याय ८ -
कभी भी खुद पर हार न मानें्।
अध्याय ९ -
अपने आशीर्वाद का महत्व समझें्।
अध्याय १० -
चारों ओर दिव्यता देखें्।
अध्याय ११ -
सत्य को वैसा ही देखने के लिए पर्याप्त समर्पण रखें जैसा वह है।
अध्याय १२ -
अपने मन को उच्चतर में लीन करें्।
अध्याय १३ -
विरक्त हो जाएँ माया से दूर होकर परमात्मा से जुड़ो।
अध्याय १४ -
अपनी दृष्टि से मेल खाने वाली जीवन शैली जिओ्।
अध्याय १५ -
दिव्यता को प्राथमिकता दो।
अध्याय १६ -
अच्छा होना अपने आप में एक पुरस्कार है।
अध्याय १७ -
सुखद के बजाय सही को चुनना शक्ति का संकेत है।
अध्याय १८ -
जाने दो, चलो भगवान के साथ एकता की ओर बढ़ते हैं्।
(इस सिद्धांत में से हर एक पर आत्मनिरीक्षण करें)
जीवन जीए !

सौजन्यः प्रा. पानगावे.

अखेरच्या श्वासापर्यंत शिक्षकाचे प्रश्न सोडवणार: मा.ज.मो.अभ्यंकर

लातूर/ प्रतिनिधी- शिक्षक सेना राज्याध्यक्ष तथा अल्पसंख्यांक आयोगाचे माजी अध्यक्ष व शिक्षक आमदार मुंबई यांचे सकाळी रेल्वेस्थानक लातूर येथे आगमन झाले. तेव्हा जिल्हापदाधिकाऱ्यांच्या वतीने यथोचित स्वागत करून लातूर नगरीतून मिरवणूक ताफा शासकीय विश्रामगृहाकडे प्रस्थान केला. माननीय ज.मो.अभ्यंकर साहेबांचा शिक्षक आमदार झाल्यानंतरचा प्रथमच मराठवाडा -लातूर दौरा होता.

शिक्षक विद्यार्थ्याला संस्कारक्षम करणारी आणि येणाऱ्या भावी पिढीला योग्य दिशा दाखवणारी व्यक्ती होय.पण खऱ्या अर्थाने समाज परिवर्तनाचे माध्यम म्हणजे शिक्षक. परंतु तमाम शिक्षण क्षेत्रात शिक्षणाचा गोंधळ उडाला असल्याने शिक्षकांना विविध समस्यांनाही तोंड द्यावे लागत आहे.त्या सोडवणूक करून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात शिक्षक बांधव आज उपस्थित होते.

१) समग्र शिक्षा अभियानांतर्गत गट साधन केंद्रातील कर्मचारी कायम करून घेण्यासाठी अभ्यास समितीत स्वतः असल्याने शासन स्तरावरून हा प्रश्न मार्गी लावण्याचे अभिवचन साहेबांनी दिले. २ २००५ पूर्वी व २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू* करून घेण्यासाठी प्रगत राज्य असल्याने अडचण नाही. तसा विधिमंडळात प्रस्ताव मांडणासंदर्भात शब्द दिला. ३ बालकाचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ जनगणना ,निवडणूक व आपत्ती या कामाव्यतिरिक्त* कोणतेही अतिरिक्त काम करू नये. तसे लेखी निवेदन जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना द्यावे काही कार्यवाही झाल्यास मी स्वतः समस्या सोडवणूक करून देईन.अशी अशैक्षणिक कामे नियमबाह्य आहेत. ४) जिल्हातर्गत विनंती बदली प्रश्न मी स्वतः सिईओ शी बोलून मार्ग काढीन. ५ उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांना ज्यादा वेतनवाढ , अवार्ड , प्रमोशन मध्ये संधी मिळण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण त्वरित स्वीकारण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करेन. ६ अंशदान टप्पा अनुदान मधील जाचक नियम व अटी रद्द करण्यासाठी प्रयत्न करेन. ७ आश्वासित सेवा योजना १०:२०:३० बक्षी समिती नुसार शिक्षकांसाठीही लागू करून घेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार. ८ इंग्रजी शाळांची गरज लक्षात घेऊनच अशा शाळांना परवानगी देण्यात यावी अशी शिफारस करणार. ९ इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या भवितव्यासाठी सेवा सुरक्षा नियम अटी व शर्ती अधिनियम शासनाकडून मंजुरीसाठी प्रस्ताव मांडणार. १०) कला, क्रीडा ,शारीरिक शिक्षण कर्मचाऱ्यांना सेवेत स्थैर्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार ...इत्यादी समस्या /प्रश्न सोडवणूकीकरीता शासन स्तरावर शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन दिले.

तसेच पक्षप्रमुख मा.उद्धवसाहेब बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त.. जो खांडावया घावो घाली । का लावणी ज्याने केली । दोघा एकचि साऊली। वृक्षु दे जैसा। ही संत परंपरा लाभलेल्या या महाराष्ट्र लातूर भूमित ज्ञानेश्वर माऊली यांच्या संत वचनाप्रमाणे जो वृक्ष लागवड करतो व जो वृक्ष तोडतो त्या दोघांनाही वृक्ष सावली देतात ते भेद ठेवत नाहीत. तेव्हा वृक्षतोड थांबवून प्रत्येकांनी पर्यावरण समतोल राखण्यासाठी समाजसचनेतील परिवर्तनाचा शिल्पकार म्हणजे शिक्षक होय.तर या सर्व शिल्पकारांनी वृक्षसंवर्धन केले पाहिजे.हा मा.उद्धवसाहेब ठाकरे यांचा संदेश घेऊन खास मुंबईहून आलो असल्याचे आपल्या मनोगतातुन त्यांनी सांगितले.व स्वतः वृक्षारोपण पंधरवाडा साजरा करण्यासाठी त्यांनी खुब्बा सिबीएससी इंग्लिश स्कूल लातूर येथे सेना परिवाराच्या वतीने वृक्षारोपण करून वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरें्। हे संतवचन सार्थक केले व दौरा संपन्न झाला.

याप्रसंगी मा.बालाजीभैय्या रेड्डी(शिवसेना जिल्हाध्यक्ष) रमेश चौगुले(राज्य सरचिटणीस) विठू भाऊ चव्हाण(राज्य उपाध्यक्ष) माणिकराव सेलूकर (मराठवाडा समन्वयक)नामदेवराव सोनवणे (मराठवाडा अध्यक्ष) (बाळासाहेब राखे मराठवाडा कार्याध्यक्ष) गोपाळ सुर्यवंशी राष्ट्रपती पुरस्कार. प्राप्त शिक्षक सुधाकरजी तेलंग(एसएससी बोर्ड अध्यक्ष) नागेशजी मापारी (शिक्षणाधिकारी मा.) वंदनाताई फुटाणे शिक्षणाधिकारी(प्रा.) तृप्तीताई अंधारे शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण) डॉ.भागीरथीताई गिरी प्राचार्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था लातूर* प्रमोदजी पवार उपशिक्षणाधिकारी लातूर दत्ताभाऊ पवार (जिल्हाध्यक्ष संभाजीनगर)संतोष अंबुलगेकर जिल्हाध्यक्ष नांदेड, दिगांबर मोरे,हालकरे माधव जिल्हाध्यक्ष परभणी, रवी भोसले जिल्हासंपर्क प्रमुख बाळासाहेब येळापूरे संपर्क प्रमुख धाराशिव शरदराव हुडगे (जिल्हाध्यक्ष प्रा.) किशोर पानसे (जिल्हाध्यक्ष प्राध्यापक संघटना) रमाकांत गरड (जिल्हाध्यक्ष मा.) अनिल स्वामी (जिल्हाध्यक्ष इंग्रजी मा.) मुनिरखान पठाण (जिल्हाध्यक्ष अल्पसंख्यांक वि.) शिवाजीराव साखरे आदर्श शिक्षक समिती राज्याध्यक्ष) सुनीलकुमार हाक्के (जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय शिक्षक संघ) संतोष पिट्टलवाड (राज्याध्यक्ष आंतरजिल्हा बदली संघटना) चंद्रकांत भोजने (शिक्षक समिती सरचिटणीस) बजरंग चोले (जिल्हा सरचिटणीस मुख्याध्यापक संघ) सुभाष मस्के जिल्हाध्यक्ष(कास्ट्राईब) माधव गीते जिल्हाध्यक्ष नवनिर्माण शिक्षक सेना,लक्ष्मण दावणकर जिल्हाध्यक्ष आदर्श शिक्षक समिती,विठ्ठल बडे सहकार संघटना, मच्छिंद्र,गुरमे जिल्हाध्यक्ष शिक्षक परिषद,विवेक सौताडीकर जिल्हाध्यक्ष कंत्राटी शिक्षक संघटना, माधव अंकुशे चेअरमन शिक्षक पतसंस्था उदगीर,माधव खिचडे चेअरमन शिक्षक पतसंस्था औसा, निशिकांत मिरकले ,सतीश भापकर,प्रदिप बरुरे,आचमे मॅडम,चिमनदरे, सतीश जाधव,सुभाष केंद्रे(राज्य कार्यकारिणी सदस्य) सचिन साबणे,शिवशंकर स्वामी,नीळकंठ पाटील, अरविंद धानुरे(कार्याध्यक्ष शि.सेना लातूर.) विलास पाटील सरचिटणीस नंदकुमार पाटील, राम कवाळे,व्यंकुराम बोनवळे,अनिल सुवर्णकार, रामकिशन चिंचोळे,अमोल जगताप ,विजयकुमार खंडागळे, व जिल्हा शाखा पदाधिकारी , ज्ञानेश्वर अभंगे ,रणजीत घुमे,दत्ता शिरुरे ,जयराज सोदले ,संगमेश्वर शिंदे , भरत कोरे,,संग्राम बिराजदार, व तालुका अध्यक्ष शिक्षक सेना सर्वश्री मा.व्यंकट करपे लातूर ,सुशेन पाटील,सतीश कौसे अहमदपूर ,सतीश कोव्हाळे औसा ,संतराम पांचाळ निलंगा ,संगमेश्वर ढगे चाकूर दीपक जामकर उदगीर, बालाजी पांचाळ रेणापूर युवासेना नेते सुमित माने व नागेश माने,रवी चिलमे मोठ्या प्रमाणात शिक्षक बंधू-भगिनी उपस्थित होते.

ताबा नोटीस नमुना झेड

दि उदगीर अर्बन को.ऑप.बँक लि., उदगीर

नियम १०७ (११) ड-१ पहा

स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी मला प्राप्त अधिकारानुसार मी ए.आर.चौधरी, वसुली अधिकारी, दि. उदगीर अर्बन को.ऑप. बँक लि. उदगीर म.स.सं.नियम ११६१ अन्वये मागणी नोटीस १०७ (३) अन्वये थकबाकीदार यांना देवून नोटीसीमध्ये नमुद केलेली रक्कम भरण्यास बजावले असताना त्यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केला आहे.

खाली सही करणाऱ्याने सदरच्या स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आलेल्या असून त्याचा पंचनामाही बँकेच्या दप्तरी उपलब्ध आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे म्हणजेच नोटीस देण्यात येते की, खालील निर्दिष्ठ केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्या अधिकाऱ्याने म.स.सं.नियम ११६१ मधील नियम १०७ (११) (ड) १ नुसार मिळालेल्या अधिकारान्वये रितसर ताबा घेतलेला आहे. विशेष करुन ऋणकोस व तमाम नागरीकांना या नोटीसीद्वारे सावध करण्यात येते की, हया स्थावर मालमत्तेच्या संदर्भात कोणतीही खरेदी विक्री, गहाण, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास तो दि उदगीर अर्बन को ऑप. बँक लि. उदगीर यांच्या एकत्रित बोजाची रक्कम व त्यावरील होणारे पुढील व्याज यांच्या कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल याची नोंद घ्यावी.

अ.क्र.	कर्जदाराचे/सहकर्जदार/ जामीनदाराचे नांव	वसुली दाखला क्रमांक व दिनांक	मागणी नोटीस दिनांक	रक्कम रुपये	स्था. मालमत्ता जप्तीचा/ ताब्याचा दिनांक
०१	कर्जदार- १. भक्ती डोअर पार्ट अनिता स्वप्नील पिलाजी रिंग रोड लातूर २. स्वप्नील सूधीर पिलाजी रिंग रोड लातूर ३. धर्मराज योगीराज भारती रिंग रोड लातूर ४. खोबरे सूजाता उमाशंकर मु.पो. वरटी पो. हरंगुळ	११०/२०२३-२४ दिनांक १९/०७/२०२३	०१/०८/२०२३	८११६८१४/- व्याज खर्च	२७/१०/२०२३
